सहामाही „ २ „
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................ ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० १
दर ओळीस......... ०१ ०६
दुसरे खेपेस ............ ०१

Six monthly .........3 ............ — 8 as
Single copy ........................ 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ...... 4 as
Repetition Per line ... 8 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 10 NOVEMBER 1902 NO 43

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १० माहे नोव्हेंबर सन १९०२ इ० अंक ४३

To,
The Editor
Berar Samachar
Dear Sir,

After sending to you the following letter for publication and seeing that you had not done so, writing to you twice again requesting either to publish it or to return it to me, you now on the 5th instant tell me that my original letter has been some where misplaced and ask me to send you a copy of the same again.

I therefore send you the copy of the original letter which I request you to kindly publish *along with this*. I shall send the papers further on.

Akola 7/11/02 } Yours truely
Deorao Vinayak

*Copy*

To,
The Editor of Berar Samachar
Akola

*Dear Sir,*

I thank you for your opening your columns for the discussion of certain proposed Municipal taxes in our town. I am sure they will do a valuable service to the public if before making any remarks, you only make yourself fully acquainted with the actual facts in connection with the Municipal proposals for, and popular objections against, the taxes.

Permit me to tell you that your remarks published in your paper of 13th instant in the article beginning with the words "our Municipal body" are, in some important places, based on an incorrect information to correct which I shall give you the whole history of the proposed taxes in a concise form, if you are willing to get the same. Your version of the question is all one—sided and consequently open to the charge of being biased and even unfair.

I am very sorry I have been the cause though unconsciously, of wounding the feelings of some of the Municipal members who are my personal friends. It is possible that my remarks were not relished by them, but when you and your "An Inquirer" will know the real position I hope I shall not be accused of levelling invectives against the Municipal Committee.

Akola 17/10/02 } Yours truely
( Sd ) Deorao Vinayak

### BEFORE THE YEAR CLOSES

The means that Heaven yields must be embraced
And not neglected, else, if Heaven would
And we will not, Heaven's offer we refuse
The proffered means of succour and redress.

*Shakespeare.*

To assure before the year closes is the firm intention of many thousands of our fellow contrymen. Numbers have given distinct pledge and promise that they will do so. And it is perfectly certain that of these thousands many will not carry the intention into effect, and that some will die un-insured. They are, not withstanding, at this time intending insurers.

That the result should be what we have foreshadowed as certain is lamentable. We naturally assume, of course, that there is a need for life assurance, or the intention would not be formed to resort to it. It is recognised as essential and the opportunity is afforded of obtaining the object in view —how great the pity, then, that the intention should fail!

The object of this little paper is to put forth a cogent reason or two for despatch in transacting this possible momentous business, on which the issues of the fate of dear and valued relations may perhaps be hanging, as by a single thread.

The year has so far sped on its course that there is but brief time left to carry out any purpose. He, therefore, who really intends insuring before it closes, should

PROPOSE AT ONCE

Now is the only legacy of Time actually in possession
To-morrow even, may be a day too late.

In many individual instances there was the same intention last year, and it was unfulfilled. So it will be next year. The want of promptitude becomes chronic and habitual. An unwise habit at all times, but in such a matter as the assurances of life, is inexcusable and dangerous in the extreme. The putting off until to-morrow what can be done to—day is probably more injudicious in the case of life assurance than with any other social transaction, and more pregnant with harm.

Nothing is gained by delay, while so much is risked. The terms will not be different, the premium will not be less, the preliminary steps will not vary. On the other hand, the terms may be more onerous, the premium higher, and the preliminary steps more difficult. Some change in health or family history may create a distinct and unfavourable difference between now and then. It may happen that the life now first class, becomes second class and to be insured only on special terms, the best that can be obtained.

This is not desirable, but the position is infinitely worse when the change eventuates in the life becoming in the interval wholly uninsurable. An accident, a severe hæmorrhage, the sequal of a fever, may so result, at any rate for a protracted period of indefinite postponment.

Putting the matter in direct personal form you are contemplating asking an insurance office to take a risk of your premature death for a small immediate consideration, because there is a fair appearance of the event being probably remote. This risk extends to the whole of your life; why then not let the Insurance office take the whole risk by allowing them to insure you at once? The real risk may perhaps be in the next few weeks, during which you propose to defer your purposed act.

There are times when life assurance is so clearly a sacred duty, that delay is not only irrational but unjustifiable, as to which each must judge for himself. "If Heaven would and we will not, Heaven's offer we refuse." There are some opportunities in our lives which as candid, reasonable, thinking men, we must admit we have scarcely the right to neglect.

The old year will close more happily and the new year open more serenely with the duty performed. That policy in the strong box will bring hours of comfort with it. An easy mind with respect to future contingencies is a condition of extraordinary value. It is a leading factor in the sum of human happiness.

"My crown is in my heart, not on my head;
Not decked with diamonds or with Indian stones;
Not to be seen; my crown is called Content."

The content which has been obtained as the result of judicious life assurance is vast and immeasurable.

In conclusion, remember well that you are never likely to regret assuring at once; you may regret, and others with you, not doing so.

NAGPUR 21st. October 1902. } M. DESOUZA.
CHIEF AGENT
*Oriental Government Secretary Life Assurance Co. Ld*

वऱ्हाडसमाचार

मित्ती कार्तिक शुद्ध १० शके १८२४

## साधु तुकाराम

रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी यांनीं 'साधु तुकाराम' याजवर एक उत्तम लिहिलेला निबंध त्यांचे चिरंजीव रा. रा. रामभाऊ यांनीं येथील लायब्ररींत वाचून दाखविल्याचें आह्मी मागें कळविलेंच आहे. त्या वाचना नंतर आठ दिवसांनीं त्या निबंधासंबंधानें वादविवाद होऊन लोकचर्चा संपूर्ण झाली ह्मणून आह्मी आज कांहीं विचार प्रदर्शित करण्याचा संकल्प केला आहे.

"तुकाराम" या नामाचा उच्चार करितांच, किंवा केलेला ऐकतांच आपल्या हृदयांत सात्विक भाव प्रकट होतात, आपला कंठ सद्गदित होतो, पूज्यभाव वाढतो व अंतरंग हर्षभरानें व्याप्त होतें. ज्यांनीं लोकहिताचा यत्न केला त्यांनीं स्वहिताचा बहुधा त्याग केलेला आढळतो व त्यामुळें प्रीतीस व पूज्यतेस ते विशेष पात्र होतातच. या साधूचे लेख वाचले असतां स्वहितापेक्षा जगाच्या हिताची काळजी तो किती वाहत होता हें तेव्हांच समजतें. तुकारामानें जें ह्मटलें आहे त्याप्रमाणें कोणी वागेल तर तो प्रति तुकाराम होईल. तसें वागणें आपणा संसारिकांस शक्य नाहीं. व इष्टहि नाहीं. तरी त्याच्या ह्मणण्यांतील ... सोडून राहिलेल्या अंशाचा आदर केला असतांहि तेवढ्यानें आपण कृतार्थच होऊं. पण मोठ्या खेदाची गोष्ट ही आहे कीं, सर्व लोक तुकारामास मोठा ह्मणतात ह्मणून आपण ह्मणतों. येरव्हीं त्याचीं मतें किंवा वचनें आह्मांला मुळींच मान्य नाहींत हा आपल्या आचरणांतील इत्यर्थ निघतो. जशीं आमचीं आचरणें आहेत, व जशी आमची रूढि आहे तदनुरूप तुकारामाचीं वचनें असतील तर तीं आह्मांला मान्यच आहेत. पण आमचें आचरण व रूढि यांच्याशीं त्या वचनांचा विरोध दिसल्यास आमचेंच आह्मांस मान्य आहे. असा वास्तव प्रकार असतां तुकाराम श्रेष्ठ असें जें आह्मी ह्मणतों तें केवळ दांभिकपण होय. तुकारामाचीं वचनें हृदयांत ठेवून त्यांतील आशयानुरूप आपण आपल्या मनाला वळण व व्यासंगांस स्वरूप देत गेल्यास स्वार्थ व परमार्थ यांचा लाभ झाल्या शिवाय राहणार नाहीं. ज्ञानदेव, नामदेव, रामदास इ० संतजनांविषयींहि असेंच आहे.

या साधूच्या चरित्रावर रा० अण्णासाहेब महाजनी यांनीं लिहिलेल्या उत्तम निबंधाचें तारीख २९।१०।०२ रोजीं येथील लायब्ररींत वाचन झालें. त्यावरून तुकारामाच्या ग्रंथांवरील त्यांचा व्यासंग केवढा मोठा आहे याचें अनुमान बांधण्यास साधन मिळालें. सुवर्णाच्या पात्रात रत्नें मांडून ठेवावीं तशीं या साधूचीं वाग्रत्नें निबंधरूपी पात्रांत भरून त्यांनीं सभासदांपुढें मांडिलीं. हीं रत्नें अत्यंत तेजस्वी होतीं हें सांगण्याची गरज काय? तुकारामाचा अवतार सन्मार्ग दाखविण्याकरितां होता, त्याच्यावर आपलें निस्सीम प्रेम व त्याच्या ठायीं आपली अनन्यभक्ति आहे, तो आपणांस सर्वथा पूज्य आहे तसाच सर्व लोकांच्या पूज्यतेस व परमादरास पात्र आहे असें त्यांनीं निबंधांत दर्शविलें आहे. अशा तऱ्हेनें व्याख्यान देण्याच्या किंवा निबंध

लिहिण्याच्या प्रवृत्तीस, तुकारामाच्या अमोल उपदेशाचा फैलाव लोकांत व्हावा याहून अन्य हेतु संभवत नाहीं. तुकाराम, नामदेव प्रभृति संतजनांनीं प्राकृतांत ग्रंथ रचना करून लोकांवर अनुग्रह केला तो त्यांच्या ग्रंथांत मात्र बहुत काळ पोंचतों राहिला. त्याचा सुपरिणाम लोक समुदायावर व्हावा, तर तद्विषयक त्यांची गति खुंटली होती. याचीं कारणें अनेक आहेत. श्रेष्ठ ज्ञातींनीं पुढें येण्यास ह्यांस सवड दिली नाहीं. पेशव्यांचे पूर्वीं, पेशव्याचे कारकीर्दींत, व त्या नंतर आणि अद्यापही, ब्राह्मणेतरांची दशा कशी होती व आहे, त्यांच्याबद्दल श्रेष्ठवर्णांच्या समजुती काय आहेत हें लक्षांत आणिलें ह्मणजे पूर्वोक्त संतजनांचे उपदेश त्यांच्या पोथींतच कां राहिले होते तें दिसेल. दोष कोणाचाहि असला तरी तो दोषच. सांप्रत सुशिक्षण, धर्मस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य इत्यादिकांमुळें या ग्रंथांस मोकळी हवा व प्रकाश मिळत आहे, आणि त्यांचा अडलेला मार्ग खुला होत आहे. तुकारामाच्या मतांची चर्चा, त्यांचा प्रसार, व अंगीकार हेंच निबंधांत संग्रहित केलेल्या व इतरत्र वचनांचें अपेक्षित कार्य आहे. ह्मणून त्याच्याकडे प्राधान्य येतें. ह्या कार्याचे कारणांचा किंवा साधनांचा विचार करणें ही गोष्ट अप्रस्तुत व गौण होय.

या निबंधास उलट दिशा असूं शकेल हें संभवनीय वाटलें नाहीं. तथापि हें अनुमान चुकीचें ठरून विरुद्ध दिशा उत्पन्न झाली. तुकाराम हा जीव कोटींतीलच एक ईश्वरभक्त होता, या दृष्टीनें रा. अण्णा साहेबांनीं त्याच्या समग्र चरित्राचें विवेचन केलें, व ते जीव कोटींतील नसून पूर्वींच मुक्त झालेल होता, व लोकोद्धारा करितां मनुष्य जन्मांत त्याची मुद्दाम योजना झाली होती हा वादाचा प्रश्न उत्पन्न झाला. व अध्यक्षा कडून अत्यंत परिश्रमानें त्याचें समर्थन करण्यांत आलें हें निःसंशय आहे. हें समर्थन कळकळीनें आवेशानें, उत्कट प्रेमानें, मार्मिकपणानें, रसभरित व अस्खलित वाणीनें, आणि श्रोतृसमाज चकित होण्यासारख्या वक्तृत्वानें झालें यांत संशय नाहीं. निबंधकारांचें तुकारामावर जसें प्रेम तसेंच टीकाकारांचें दिसलें. टीकाकारांचा अध्यात्मज्ञान संपादण्याचा प्रयत्न आणि त्यांची भक्तिपरायणता हीं स्पृहणीय आहेत. त्यांच्या सार्वत्रिक चांगलेपणाविषयीं आह्मांस व इतरांसही आनंद होत आहे व अभिमान वाटत आहे. पण त्यांच्या या सर्व गुणांचा व्यय अस्थानीं व असमयीं झाला. विषयासंबंधीं मतभेद गौण होता. ह्मणून मूळचा सुंदर निबंध जशाचा तसा अबाधित राहूं देणें, हें, तुकाराम, निबंधकार, टीकाकार व अन्यजन या सर्वांसच अधिक श्रेयस्कर झालें असतें. तुकाराम हा देवाचा साधा भक्त, त्याची वृत्ति साधी, व वाणी ही साधी व रसाळ, आणि निबंधाचीही रचना साधी, भाषा साधी ( सहेतुक ) व प्रेमळ आणि ह्मणून विशेष खुलणारी, तशीच राहूं द्यावयाची होती. अहो ! तुकाराम देव होता किंवा माणूस होता, कसेंहि झटलें, तरी त्याच्या अभंगांत गुंफिलेल्या मुक्ताफळांच्या दिव्य कांतींत अंतर पडणार कोठून ? तीं निरंतर अविकारीं व आपणास लाभ देणारीं अशींच राहणार. आपणाला फलप्राप्तीकडे पहावयाचें, तितकें कारणांकडे नाहीं. आणि टीका करण्यापूर्वीं निबंधकारांचा विचार घेतला असता, तर त्यांनीं या कारणांचा हट्ट धरिला असतां असें ह्मणतां येत नाहीं.

ज्यांच्यांत लोकोत्तर बुद्धि व कृत्यें दिसून येतात त्यांस देवपण देण्याची लोकांत प्रवृत्ति होते. ही जशी भक्ति मार्गांत तशी इतरत्रही आढळते. अशा व्यक्तींत ईश्वरी अंश किंवा तेज आहे असें मानितात. ज्ञानदेव, नामदेव, कबीर, रामदास, हे संत मालिकेंत; युधिष्ठिर, विक्रमादित्य, शिवाजी हे नृप मालिकेंत; चरक, वाग्भट्ट, भिषग्वर्यांत ज्योतिर्विदांत भास्कराचार्य, वैय्याकरणांत पाणिनि, कविवर्यांत कालिदास हे देवपदवी पावले आहेत. याच न्यायानें भूमितिशास्त्रांत युक्लिड, बाष्पशक्तिप्रवर्तकांत जेम्सवाट वगैरे त्या पदास प्राप्त होतील. कांकीं यांनींहि जगावर असाधारण उपकार केले आहेत. वास्तविक पाहतां या अनंत विश्वांत ईश्वरी अंश ज्यांत नाहीं असें काय आहे ? जरी असंख्य लोक दारिद्र्यपीडित आहेत, तरी कोणी अपार संपत्तीच्या साधनानें ऐषआरामांत लोळत असतात, तेव्हां हेहि साक्षात ईश्वर कां समजूं नये ? पूर्वोक्त व्यक्तींस ज्या कारणांकरितां ईश्वरी अंश मानितात, त्यांच्या कृत्यांशीं अद्भुत व अतर्क्य सामर्थ्याची, व चमत्कारांची सर्वदा जुळणी करीत असतात त्यांतील मर्म ओळखून वागावें हेंच उचित आहे. एरव्हीं आह्मीं मानवांनीं त्या अनंत शक्ति प्रभूची बरोबरी करण्यास कोणत्या गुणांनीं उद्युक्त व्हावें ! या जगांत बुद्धीचें व व्यवसायाचे जितके पर्याय आहेत त्यांत चढत्या व उतरत्या पायऱ्या आहेत. तरी त्यांस ईश्वर ही संज्ञा लावूं नये. कोणी जड बुद्धीचा, कोणी तीव्र बुद्धीचा, कोणी अधिक तीव्र बुद्धीचा विद्यार्थी आढळतो. व कोणी विशाळ व लोकोत्तर बुद्धिमत्तेचा असतो हें आपण सर्व व्यवसायांत पहातों. ह्या सर्व लीला त्या अचिंतनीय शक्तीच्या होत. ह्मणून त्या त्या व्यक्ति ईश्वर आहेत असें नाहींच.

कोणी अधुनिक श्रेष्ठ ग्रंथकारानें ह्मटलें आहे कीं ज्या काळापासून पूर्वींचे लोक, ऋषि, शास्ते वगैरे हे देव होते असें आह्मीं समजूं लागलों तोच ऱ्हास काळाचा पहिला दिवस उगवला. त्याच दिवसापासून बुद्धीस जडत्व आलें, कर्तव्यशून्यता भासूं लागली, स्वसामर्थ्यावरील विश्वास उडाला व उत्साह नष्ट झाला. तो ह्मणतो कीं, अशा व्यक्तींस ईश्वर मानून त्यांच्या चरित्राचा विचार केला, अथवा मनुष्य समजून तो केला, तर अधिक लाभ कशांत आहे हें पाहवें; तसेंच आपल्या प्रगतीचा मार्ग मोकळा करण्याचें किंवा तो खुंटविण्याचें साधन कशांत आहे हें विवेकबुद्धीच्या साह्यानें ठरवावें.

तुकाराम नामदेवाचा अवतार, नामदेव उद्धवाचा, उद्धव प्रल्हादाचा, जनाबाई कुब्जेचा, व कुब्जा मंथरेचा अवतार इ० विधानें खऱ्या भावानें केलीं हें जरी सत्य आहे तरी ह्या मूळ पीठिकें पासून लाभ कोणता? बिचारा तुकाराम ! विविध कारणांनीं संसारांत त्रास पावला, स्त्रीपासूनही त्रास पावला व स्त्री जीजाबाई तुकारामाकडून त्रस्त होऊन गेली, तरी ही मंडळी आपण अंतस्थ मुक्तच आहों असें जाणून बाहेर ढोंग करून दाखवीत होतीना ?

आणखी, ही सहनशीलता, ही भक्ति, हा साधेपणा, हा उपकारी स्वभाव, हा स्वहित त्याग, ही शांति, ही क्षमा इ इ. अमोलिक गुण, परिमित व अल्प शक्तिवान् मानवाकडून धारण करविण्यांत, ईश्वराच्या चातुर्याचें व सामर्थ्याचें गौरव आहे, किंवा तें अंतस्थ घटोत्कचाचें सामर्थ्य, पण बाहेरून पामरा प्रमाणें भासणाऱ्या सोंगाड्याचे सोंगात आहे याचा विचार करावा.

कोणी कोणी विद्वान व मान्य गृहस्थहि, केव्हां केव्हां सुप्रसिद्ध व सुसंमत गृहस्थाविषयीं समाजांत मुद्दाम प्रतिकूल टीकां करून वाहवा मिळविण्यास व तद्द्वारा आपल्या योग्यतेंत भर घालण्यास पाहतात, तसा प्रस्तुतचा प्रकार नाहीं. कां कीं टीकाकारांची योग्यता स्वतंत्रपणेंच मोठी आहे. त्यांनीं केलेली टीका सद्हेतुमूलक आहे पण तो हेतु ज्या समजुतीच्या आधारावर उभा आहे ती समजूत भ्रांतिमूलक आहे ह्मणून शोधून ती नीट करावी अशी विनंती आहे.

सारांश हा कीं अशा महात्म्यांचें निरीक्षण ते मनुष्यच होते अशा समजुतीनें कोणी केलें असलें व तें कोणास आवडलें नाहीं तरी तें खोडून काढलें पाहिजे असेंच आपण समजूं नये.

---

वरील साधु तुकारामा संबंधानें लायब्ररींत जो वादविवाद झाला तो फक्त रा.रा. व्यंकटेश कृष्ण देसाई यांनीं केला. आणि त्या वादाला समर्थन करणारा असा उपसंहार सभेचे अध्यक्ष रा.रा. गणेश रामचंद्र दामले यांनीं आपल्या एका स्वतंत्र निबंधांत केला होता. या वाद विवादाचा मुख्य आशय असा होता कीं, रा. रा. अण्णा साहेब महाजनी यांनीं आपल्या निबंधामध्यें साधु तुकाराम यांचा उल्लेख एक वचनानें केलेला आहे हा मोठा दोष आहे. अध्यक्षांचे मतानें असा एक वचनी प्रयोग उपयोगांत आणण्याचा अधिकार रा. अण्णासाहेब यांस नाहीं. कां कीं, त्यांच्या ठायीं तुकारामा विषयीं इतका सलगीचा भक्तिभाव नाहीं. मूळच्या निबंधाविषयीं असाहि एक दोष दाखविण्यांत आला कीं साधु तुकारामाशीं रा. अण्णासाहबांचें तादात्म्य न झाल्यामुळें त्यांच्या निबंधांत प्रेमरस उतरला नाहीं आणि रा. देसाई यांच्या ह्मणण्या प्रमाणें रा. अण्णा साहेबांचे अंगीं भक्तिरस नसल्यामुळें तुकारामाचा ग्रंथ समजण्या इतका ईश्वरी प्रसाद त्यांच्यावर झालेला नाहीं. रा. दामले यांनीं आपल्या वेदान्ताच्या अभ्यासाची साक्ष देऊन परमादराच्या गर्वोक्तीनें सांगितलें कीं तुकारामाच्या गाथ्याची मांडणी बद्ध, मुमुक्षु, सिद्ध, आणि साधक या चार जणांच्या दृष्टीनें व्हावयाला पाहिजे होती आणि आपल्या ह्मणण्याच्या निदर्शनार्थ त्यांनीं तुकारामाच्या कांहीं अभंगाचें वर्गीकरण वरील चार प्रकारांत करूनहि दाखविलें. उभयता टीकाकारांच्या मतानें तुकाराम हे अंतर साक्षीनें ईश्वरच होते आणि त्यांनीं लोकांवर उपकार करण्यासाठीं, या भवसागरांतील विविध दुःखांतून तारण्यासाठीं आपल्या अभंगांचा सेतूच बांधला आहे. आमच्या दृष्टीनें अभंगा मध्यें तुकारामाच्या खाणाखुणा नपून सर्व अभंग लोकव्यवहाराला अनुलक्षून केलेले आहेत. आमच्या दृष्टीनें तुकारामांनीं जे अभंग केले आहेत ते स्वतांच्या चरित्राला अनुलक्षून आणि त्या चरित्राचा पडताळा लोकव्यवहारांत पाहून केलेले आहेत आणि ह्मणूनच अभंगाची विचार दृष्टी पदोपदीं व्यवहारांत पटते आणि पारपंचिक गोष्टीमध्येंहि मनाला अभंगामध्यें एका तऱ्हेचा अवर्णनीय विसावा वाटतो. तुकाराम हा खरा सुधारक होता आणि आह्मी ह्मणतों कीं के. महादेव गोविंद रानडे यांनीं आपल्या ‘ मराठ्यांचा उत्कर्ष ’ या इंग्रजी पुस्तकांत लिहिल्या प्रमाणें तुकाराम आदि करून जी साधुसंत मंडळी ह्या कालांत निपजली तिनें मराठी राष्ट्राचा उदय काल आणिला आणि लोक प्रवृत्ती इष्ट गोष्टीकडे वळविली.

---

## कडक शिक्षा,

( प्लेगाची बातमी न दिल्या बद्दल )

कांकडीच्या चोरीला फांशीची शिक्षा अशी एक जुनी ह्मण आहे. तिची सत्यता बाळापूरच्या तहशील कचेरींत दिसून आली, मि. शेख मुनीर तहशिलदार व माजिस्ट्रेट वर्ग २ यांच्या समोर एक प्लेगा संबंधी खटला होता त्याची हकीकत अशी कीं, गेल्या सप्तेंबर महिन्यांत खामगांवाहून आजारी होऊन एक मनुष्य बाळापुरास आपल्या घरीं आला, हा मनुष्य रा० रा० देवराव व्यंकटेश मुनसरीम यांचा बंधु होता. तो दिवसा जसा दहा अकरा वाजतां आला असेल. त्यांच दिवशीं सुमारें तीन वाजण्या सुमाराला खामगांवाहून बाळापुरच्या तहशिलदाराकडे वर्दी आली कीं, फलाणा फलाणा इसम आजारी होऊन बाळापुरास आला आहे. लागलींच राजश्री देवराव यांच्या घरावर सरकारी बंदोबस्ताची फौज आली. डाक्टर साहेबांनीं आजारी मनुष्याला तपासून प्लेगाचा आजार आहे असा निर्णय केला. त्या प्लेगग्रस्त इसमाला व त्याच्या घरांतील मंडळीस निराळें गांवाबाहेर ठेविलें. पुढें प्लेगाचा मनुष्य मरण पावला आणि या प्रमाणें ती सर्व गोष्ट येथेंच संपली.

पण पुढें असा प्रश्न निघाला कीं राजश्री देवराव व त्यांचे बंधु नानराव यांनीं प्लेगाचा रोगी घरीं आल्याबद्दल वर्दी दिली नाहीं ह्मणून त्यांच्यावर फौजदारी खटला करावा; आणि तोच हा वर सांगितलेला फौजदारी खटला होय. पहिल्या आरोपीनें ५० रुपये दंड द्यावा आणि दुसऱ्या आरोपीनें एक महिन्याची साधी कैद भोगावी अशी शिक्षा माजिस्ट्रेट साहेबांनीं फर्माविली आहे. वरील शिक्षेंत असा फरक कां केला हें आह्मास कळत नाहीं. कदाचित् पहिला आरोपी मुनसरीम आहे ह्मणून दयेचा पाझर फुटला असेल तर न कळे ! ही शिक्षा कायद्यानें मंजूर आहे किंवा नाहीं या संबंधाचा प्रश्न कायदे पंडित विचारांत घेतील. पण गरीब बिचाऱ्या

आरोपींचा भाऊ मृत्यूनें नेला तो नेलाच. त्यांच्या ऐपती बाहेर त्यांस राजदंड द्यावा लागला तो निराळाच. आणि या शिवाय कारागृहवासाची शिक्षा भोगण्या इतकी त्यांची कुकर्मेंषा उभी राहिली. नशिबाचा फेरा विचित्रच म्हटला पाहिजे.

प्लेगाची वर्दी देणें हें प्रत्येकाचें कर्तव्य आहे, आणि जो चुकेल तो गुन्हेगार होत असतो अशाविषयीं हा पहिलाच खटला करण्यांत आला. प्लेगाची वर्दी देण्याचें काम सार्वजनिक आहे आणि तें बरोबर बजाविणें चांगले खरें, पण जर कोणी चुकला तर त्याला वर प्रमाणें शिक्षा द्यावी हें निदान युक्तीला तरी नीट दिसत नाहीं, सरकारानें आपला बंदोबस्त पक्का ठेवावयाचा होता आणि त्याला जर कोणी न जुमानील तर तो गुन्हेगार होईल. परंतु निव्वळ चुकीनें वर्दी दिली नाहीं तर हा गुन्हा इतका भयंकर होतो हें कळल्या पासून विनाकारण नसती दहशत मात्र बसेल. आणि लोक लपवा छपवा करूं लागतील सरकारी बंदोबस्ताविषयीं लोकांच्या मनांत अप्रेम उत्पन्न होईल आणि लोकांशीं गोडीगुलाबीनें वागून जो कार्यभाग साधावयाचा तो अगदींच साध्य होणार नाहीं. लोकांवर सक्ती होऊं नये अशा विषयीं मे. कुमार साहेब फार खटपट करितात आणि ते उपदेशानें लोकांचीं मनें इष्ट कार्याला प्रवृत्त करितात. अशा उत्कृष्ठ व्यवस्थेखालीं इतकी कडक शिक्षा होईल असें कोणासही वाटलें नाहीं. पन्नास रूपये म्हणजे मुनसरीमाच्या दोन महिन्याचा पगार होय. आणि एक महिन्याची कैद त्याच्या कुळाला मोठा कलंक होय! असो. 'छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति' म्हणतात तें खोटें नाहीं. अशा शिक्षेनें या जिल्ह्यांतील प्लेगाच्या उत्कृष्ठ बंदोबस्तालाही मोठा कमीपणा आहे!

हीही गोष्ट विसरण्यासारखी नाहीं कीं, प्लेगाच्या वर्दीनें प्लेग म्हणजे टळतोच असा काहीं प्रकार नाहीं. हा ज्या मानाचा उपाय आहे त्या मानानें त्याला महत्व द्यावयाचें होतें. शिवाय आजारी मनुष्याला गांवाबाहेर काढण्यांत आलेंच होतें. अशा स्थितींत सौम्य व माफक दंडाची शिक्षाहि पुरेशी झाली असती. पण नशीब बिचाऱ्या आरोपींचे! माजिस्ट्रेट साहेब प्लेगा विषयीं इतकी कडक दक्षता ठेवितात ही त्यांस भूषणाची गोष्ट आहे. पण प्लेगाचा मनुष्य गांवांत येतांनाच त्यांच्या शिपायी प्याद्याला तो आढळला नाहीं ही गोष्ट मात्र त्यांच्या कडक अंमलदारीला कमीपणा आणणारी आहे.

## The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 10 1902

The report of the Indian Universities Commission is not favourable to the progressive interests of the higher education in this country. It was received with a feeling of alarm; and the general public was fully attentive to the great issues of education that were at stake in the final adoption of the report by the supreme Government. Public meetings of the educated community in the nation were held in the different centers of the severa presidencies and an earnest prayer was made to the Government to publish the full text of the report and to notify the intentions of the Government in regards to the several proposals that are contained in the body of the report. Lord Curzon listened to the prayers of the people and is determined to take final steps after the whole report is fullydiscussed and supplemented by a further collection of opinions on the great and momentuous recommendations referred to in the report. In this connection the Government of India have issued to the Local Governments a circular letter dealing with certain noteworthy points in the report.

The object of the Government is to elevate the standard and efficiency of University teaching. The advancement of learning should be secured in such a manner that the present lines of working should be suited to the conditions of the modern times. The experiment of promoting higher education has proved after a trial of over fifty years that the current system requires a change of a revolutionary character in order to adopt education to the varying needs and conditions of different places and different times. We have no fight with the Government in so far as they, with their best intentions, deal with general principles. But differences arise when the Government begin to fill the details in their rough sketch of the map of Indian University education. Our general apprehensions are however allayed to some extent by the compromising spirit in which the circular letter of the Government is drafted to invite a full and detailed criticism on the subject matter of the report. The first item in the report is the problem of minimum fees. In the first place, it is necessary to note the historical sequence of this proposal. For the last twenty years or so, it has been the avowed policy of the Government to stimulate private enterprise. This policy though it shifted the burden of costs to private shoulders was welcome because it was thought to aim at promoting higher education in a cheap manner. Private schools and colleges were welcome like any thing. Their development was then the object of the official circle. But it is now thought necessary to prevent the over—growth of the private enterprise and to give a decisive blow to the competitive under-selling of educational advantages. The old policy of expansion receives a check and the brake to the engine of private enterprise is found in fixing the minimum standard of fees in private institutions also. The Government declare that it is not their object to make education the monopoly of the rich by raising the rates of fees but that their efforts are aimed at protecting the children of the country against wasting the only years of their lives during which education is possible. We object to the proposal of fixing a minimum rate of fees. In an extremely poor country like India, the present rates of fees are already beyond the means of even well—to—do families. We would welcome all proposals that secure efficiency in a college but it will be a wrong policy to presume that a scale of low fees without considerable endowments or subscriptions must be detrimental to the standard of efficiency with which all institutions ought to conform. We are not however blind to the fact that many students pursue higher education whereas their means as well as their abilities are unsuited for this higher education. But the question of fees does not provide against the waste of the youthful energies of such students as are quite unfit to receive University training. The Hon'ble Mr. Justice Bannerjee has given his high authority to the view for which the public of India is fighting against the Government. The higher the fees the more education becomes the monopoly of the rich. The evil effects of inefficient teaching will not disappear with the high fees in a college. They will multiply and recur in a manifold manner. But the real remedy lies in opening new lines of activity and prospects of employment. When the students' world will see what chances of promotion they have in life they will not run to the colleges but to the different institutions where they will find fitting opportunities to give a full play to their abilities. India is thus in sore want of industrial and commercial schools. But she can not afford to close the present institutions.

—:0:—

We do not think that Mr. Kumar Shri Harbhamji Ravaji will lend support of his weight and authority to such a harsh measure of punish—ment as has been passed by the Tehasildar of Balapur on two gentle—men for not giving due information about the arrival of their brother from plague—stricken taluka in a feverish and sickly condition. Ad—mittedly that ommission is a failure of an important duty in the interests of public health and safety. But there is also another side of the picture that in the present state of things a duly lenient punishment would have equally produced an adequate effect upon the general public.

## वऱ्हाड

हवामान— दिवाळीच्या सप्तकांत पडलेल्या पावसानें हवा बिघडली होती पण आतां हिंवाळ्याला चांगला प्रारंभ झाला आहे. शेवटच्या पावसानें कांहीं कांहीं पिकांचें नुकसान झालें आहे. पण रब्बीच्या पिकाला चांगला फायदा होईल. किरकोळ हिंवताप, खोकला वगैरे आजार बळावले आहेत.

गेल्या ७ वे तारखेला मे० कुमार श्री हरभामजी रावजी डिपुटी कमिशनर हे जळगांवास गेले आणि त्यांनीं त्या तालुक्यांतील सभ्य गृहस्थांची सभा करवून प्लेगासंबंधानें करावयाचा बंदोबस्त नीटपणें समजून सांगितला. प्लेगाची बातमी अगोदर चावडीवर न्यावी, स्थलांतराचा उपाय अंमलांत आणवून स्वच्छता चांगली ठेवावी इत्यादि गोष्टी त्यांनीं लोकांच्या मनांत भरवून दिल्या.

रा. रा. उत्तमराव यशवंतराव नायब तहशिलदार, चांदूर यांस एक महिन्याची हक्काची रजा देण्यांत आली असून त्या रजेंत रा. रा. नरहर अमृत यास नायब तहशिलदार नेमण्यांत आलें.

प्लेगानें मृत्यु— गेल्या जानेवारीपासून आक्टोबरच्या ४ थे तारखे पर्यंत १४६० माणसें आजारी झालीं व १०९० मरण पावलीं. त्यापैकीं नुसत्या खामगांवास २७९ माणसें मेलीं व बाकीचे सुमारें ७९० मृत्यु बुलढाणे जिल्ह्यांत झाले.

प्रमोदसिंधु कर्ते लिहितात कीं खालील गृहस्थ यंदाच्या वकिलीच्या परीक्षेंत पास होणार आहेत असें समजतें:-

रा० रा० अनंत बाळाजी ओक, महादेव गंगाधर मराठे, आणि शंकर गोविंद जोग.

रा. रा. रामचंद्र विष्णु महाजनी बी. ए. एल. एल. बी. यांनीं गेल्या शनिवारीं येथील लायब्ररींत शीख लोकांविषयीं कांहीं उपयुक्त माहिती दिली. एकंदरीनें सर्व माहिती चांगली गोळा केली होती आणि तिच्या पासुन पुष्कळ फायदा होण्या सारखा आहे.

गेल्या ता. २६ रोजीं निंबोळी तालुके आकोट येथील विठू नावाच्या एका माणसानें आपली बायको गजी ही आपल्या प्यारा बरोबर रात्रीं रत असतांना दिसली म्हणून त्या दोघांचा कुऱ्हाडीनें खून केला. कायद्यानें त्यास कोणचीहि शिक्षा होवो परंतु व्यभिचारांत लोळणाऱ्या मंडळींनीं या गोष्टीपासून शहाणे व्हावें. पापाचा घडा केव्हां भरतो याचा नेम नाहीं.

बाळापूर ता. ८।११।०२

येथील शाळा मास्तरांपैकीं एका शिक्षकानें एका विद्यार्थ्याला उशीरानें शाळेला गेल्या बद्दल बराच मार दिला होता. विद्यार्थ्यानें डाक्टराचें सरटिफिकीट घेतलें आणि फौजदारींत मास्तरावर फिर्याद केली होती. मि० तहशिलदार माजिस्ट्रेट यांनीं आरोपीस सोडून दिलें. कांहींहि असो, मारकट शिक्षकांनीं शुद्धीवर यावें.!

नोटीस.

रा० रा० विश्वनाथ सदाशिव आप्पा हेरे राहणार उमरावती— यांस.

खाली सही करणार इजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्हास सुमारें तीन वर्षें झालीं, मुखत्यारपत्र दिले आहे. तें आजतारखेपासून रद्द समजावें त्या मुखत्यारपत्रावरून कोणत्याही प्रकारच्या देववेवीचा व्यापार करूं नये. केल्यास जबाबदार तुम्ही व्हाल. मी अगर माझी इस्टेट होणार नाहीं. मी दिलेले मुखत्यारपत्र मला वापस करावें. कळावें, तारीख ८।११।०२ इसवी.

सही

मंजाबाई जवजे धबाप्पा राहणार
बोरगांव मंजू तालुके आकोला दस्तुर
विठोबा कृष्णाप्पा वाणी.

जाहिरात

या जाहिर नोटीसीने सर्व लोकांस:—

खाली सही करणार इजकडून कळविण्यांत येते कीं विश्वनाथ सदाशिव आप्पा हेरे राहणार उमरावती यानला मी तीन वर्षें झालीं, कुलमुखत्यारपत्र दिले होते ते आजतारखे पासून रद्द समजावें जो कोणी त्याच्याशीं मी दिलेल्या मुखत्यारपत्रावरून देववेवीचा व्यापार करील त्याचा तो जबाबदार राहील. मी व माझी इस्टेट राहणार नाहीं. कळावे, तारीख ८ नोवेंबर १९०२ इसवी.

सही.

मंजाबाई जवजे धबाप्पा वाणी
राहणार बोरगांव मंजू दस्तुर
विठोबा कृष्णाप्पा वाणी

## वर्तमानसार

स्तुत्य हुकूम—कुटुंबांतील मिळविता पुरुष प्लेगनें मेल्यामुळें ज्या कुटुंबांतील माणसें उपाशीं मरत असतील, त्यांस मुनिसिपालिटीनें फुकट धान्यधुन्य पुरवावें असा म्हैसूरचे दिवाणानीं हुकूम केला आहे.

उत्कृष्ट योजना— तिकिट कलेक्टरचे जागेवर युरोपियन व युरेशियन पोरांस न नेमतां त्या जागीं पेनशनर नोकरांना नेमण्याचें एन. डब्ल्यू. रेलवेनें ठरविलें आहे. स्त्रियांच्या डब्यांत तिकिटें तपासण्यास जाणारेही तरुण असूं नयेत अशी या रेलवे कंपनीनें तजवीज केली आहे.

अर्धा फूट पापण्या— पंजाबांतील उताओ नांवाच्या गांवीं अर्धा फूट लांब पापण्या व एक फूट लांब मिशयाचा मनुष्य आला आहे.

महादेवाची भव्य पिंडी—मध्यप्रांतांत पोहणा येथें एक पुरातन हेमाडपंती श्री महादेवाचें देवालय आहे. त्याची पिंडी इतकी मोठी आहे कीं त्या शाळुंकेमध्यें कोणतेंही धान्य बरोबर सव्वा खंडी राहूं शकतें.

जगांत अति मोठें रत्न— हें पुष्कराज रत्न मूळ ब्राझील देशांत सांपडलें. ह्याचें वजन इंग्रजी २ पौंड आहे. ह्याची लांबी १८ सेंटीमिटर आणि रुंदी ११ सेंटीमिटर आहे.

गुप्त दान—श्रीक्षेत्र काशी येथील हिंदु कॉलेजाला एका युरोपियनानें ६ हजारांचें गुप्त दान दिलें असें कळतें.

लेख येऊं लागले—लंडन टाइम्समध्यें निझामच्या राज्यासंबंधानें दोन लेख प्रसिद्ध झाले आहेत. निझामच्या राज्याची व्यवस्था हल्लीं चांगली नसून ती सुधारली पाहिजे. ती दुसऱ्या कोणी, ह्मणजे अर्थात इंग्रज सरकारनें तरी सुधारली पाहिजे किंवा स्वतः निझामनें तरी सुधारली पाहिजे असें या लेखकाचें ह्मणणें आहे.

वेलटन येथें ब्रामर नांवाच्या कुमाराच्या स्त्रीनें आपल्या मृत बालकाचें चुंबन घेतल्यानें त्याचें विष चढून ती मरण पावली.

विचित्र स्त्रिया— आस्ट्रेलिया येथील २ विचित्र स्त्रिया थोडे दिवसांत हिंदुस्थानांत येण्याकरितां तेथून निघणार आहेत. ह्या स्त्रिया सख्या बहिणी आहेत. एकीचें वजन अदमासें २० मण आहे! तिच्या छातीचा घेर ९७ इंच, कमरेचा घेर ८० इंच, हाताचा व्यास २५ इंच असून तिचें वय फक्त २५ वर्षांचें आहे! दुसरीचें वजन १२॥ मण असून तिचें वय १९ वर्षांचें आहे.

१५०० फूट उंचीचा पर्वत आड असला तरी मार्कोनीच्या यंत्रानें तारांवांचून बातमी पाठवितां येतें असें अलिकडच्या प्रयोगावरून सिद्ध झालें असून लवकरच अमेरिका व इंग्लंड यांचे दरम्यान या यंत्रानें बातम्या पोंचवितां येतील असें मार्कोनीचें ह्मणणें आहे.

चमत्कारिक प्रकार:—मलबार येथें एक मुसलमान एका संन्याशाला लहान लहान धोंडे मारीत होता. तेव्हां संन्याशानें त्याला तूं वेडा होशील असा शाप दिला. त्याप्रमाणें तो खराच वेडा झाला. मग त्याच्या नातेवाईकांनीं संन्याशास विनविल्यावरून संन्याशानें आपलें थोडें उष्टें दूध त्याला प्यावयास दिलें आणि लेंगेच त्याचें वेडहि गेलें.

धुराचा उपयोग—ब्रुसेल्स, बेलजियम वगैरे शहरांत धुराचा उपयोग करण्याची नवीन तऱ्हा निघाली आहे शहरांतील सर्व धूर छिद्रमय पदार्थ घातले आहेत अशा एका फिल्टरांत जमवून त्यावर पेट्रोलियम बेनझाईन वगैरे पदार्थ सोडतात. त्या योगानें सर्व जमलेल्या धुराचा गॅस तयार होतो. या ग्यासाचा घरगुती कामांत, दिवे लावण्यांत वगैरे पुष्कळ कामीं उपयोग करितात.

३१००० रुपये बक्षीस— बेलजियम सरकारनें फास्फरसाशिवाय आगकाडी तयार करण्याची युक्ति काढणारास ३१ हजार रुपये बक्षीस लाविलें आहे. आमच्या लोकांना काडी तयार करण्यास फास्फरस लागतो हेंही ठाऊक नाहीं!

अनीतीची कमाल— एका जपानी प्रधानानें वेस्ट इंडिज बेटांतून पुष्कळ प्रवास केला होता. तो असें ह्मणतो कीं, मर रस्त्यावर दिवसादवळ्या उघडपणें पुरुषास निर्लज्जपणानें आपली रतीसुखाची इच्छा तृप्त करण्याविषयीं विनंती करणाऱ्या स्त्रिया सेंटपायरी शहरांत मात्र मला आढळल्या! सेंटपायरीचे लोक अत्यंत नीतिभ्रष्ट होते, असें ह्मणतात. या साठींच ईश्वरानें आपलें प्रळयकाळचें रूप दाखवुन तें शहर एका क्षणांत जाळून टाकलें असावें.

चमत्कारिक नवीन यंत्र— घरांतील माणसांची हालहवाल कसकशी होते तें पहाण्यास सांपडेल अशा प्रकारचें एक नवीन यंत्र निघालें आहे. या यंत्राचें नांव "पारलर बायोजित" असें आहे. याची किंमतही थोडी आहे. यंत्र चालविणें फारसें कठीण नाहीं. घड्याळाप्रमाणें किल्ली देऊन फक्त एक चाक फिरविलें कीं, यंत्र चालतें साधारण स्थितीच्या कुटुंबाला आपल्या घरांतील माणसें हिंडतां फिरतां काय काय करतात याचीं चित्रें या यंत्रानें सुरेख निघतात व ती हवी तेव्हां पाहण्यास सांपडतात.

शक्तिवान् पहिलवान— पंढरपूरचा एक नामांकित ब्राह्मण पहिलवान नुक्ता वारला. याची भर उमेदींत इतकी शक्ती होती कीं, तो मरलेल्या पखालीसहित रेडा उचलीत असे!

खाण सांपडली— मद्रास इलाख्यांतील कर्नूल जिल्ह्यांत बेवनपाली या मुसलमानी संस्थानांत एक मोठी दगडी कोळशाची खाण निवालजी लालजी नांवाच्या एका व्यापाऱ्यास सांपडली आहे. ती खणण्याचा हक्कही नबावापासून त्यास मिळाला आहे. खाणींतील कोळसे पृष्ठ भागापासून फक्त १०-१२ फुटांवरच आहेत.

पुरुषास मूल—मद्रासच्या जनरल हास्पिटलमध्यें परवा एका मनुष्याच्या पोटांत झालेलें आवाळूं कापून बाहेर काढलें तों त्याचे आंत मनुष्यासारखी दोन डोकीं एकमेकांस चिकट ल्यासारखीं निघालीं त्यांस केस व दांतही होते! यामुळें त्या शहरांत एका पुरुषास मूल झालें ह्मणून बातमी पसरली होती!

अमानुष क्रूरता— दक्षिण अमेरिकेंतील कॉरिंथ शहरांत टामळर्क नांवाच्या शिद्द्यानें एका गोऱ्या बाईचा भयंकर खून केला होता, व तो अपराधही त्यानें कबूल केला होता, शिद्द्याचें हें कृत्य भयंकर तर खरेंच; परंतु त्यास शिक्षा करण्यांत जो क्रूरपणा झाला तो केवळ राक्षसी ह्मटला पाहिजे. खुनाबद्दल झार्कला जिवंत जाळण्याची शिक्षा देण्यांत आली. ही बातमी गांवांत समजतांच सर्व लोकांत आनंद झाला. हा 'समारंभ'(!) पाहण्यास दूरदूरचे लोक इतके येऊं लागले कीं, त्यांचेसाठीं स्पेशल गाड्या सोडाव्या लागल्या! (ता० २८ सप्टेंबर रोजीं) हजारों लोकांनीं जमून व तुरुंगावर हल्ला करून झार्कला बाहेर काढून एका मैदानांत आणलें. मैदानाचे भोंवती प्रेक्षकासाठीं जागा केल्या होत्या. स्त्रिया व वर्तमानपत्रांचे रिपोर्टर यांना जागा रिझर्व ठेविली होती! लोक जमल्यावर या शिद्द्यास एका लोखंडी खांबास बांधलें व त्याचे भोंवती राकेलनें भिजविलेले लांकडाचे ओंडे रचले. समारंभाचे व्यवस्थेसाठीं २० नागरिकांनीं स्पेशल पोलीसचें काम पत्करलें होतें! सर्व सिद्धता झाल्यावर जिचा खून झाला होता तिच्या भावानें, टाळ्यांचा प्रचंड कडकडाट चालूं असतां, मशालीनें त्या चितेस आग लाविली! येथें ख्रिस्ती धर्मानें काय रडावें!!

चमत्कारिक फिर्याद— एका अमेरिकन रेलवेच्या अपघातामुळें सायमन कर्झ नांवाच्या एका ज्यूस आपली दाढी काढावी लागली त्यामुळें त्यास आपल्या देवळांतील गवयाचें काम आतां करितां येणें शक्य नाहीं. ह्मणून त्यानें कंपनीवर २५ हजार रुपयांच्या नुकसानीची फिर्याद केली आहे!

बायसिकलची शर्यत—पुण्यापासून तळेगांवपर्यंत व पुनः परत, याप्रमाणें ४० मैलांची शर्यत ता० १२ रोजीं बायसिकलवरून करण्यांत आली. शर्यतींत पांच बक्षिसें ठेविलीं होतीं; पहिलें ७५ रुपयांचें बक्षीस रिचर्डसन नांवाच्या सोजिरास मिळून बाकीचीं चार सोन्यारुप्याचीं पदकें चार पारशांस मिळालीं. रिचर्डसन यानें हे चाळीस मैल २ तास ६ मिनिटांत आटोपले!

आश्चर्य.—स्पेनच्या एका वर्तमानपत्रांत एक आश्चर्यकारक बातमी आली ती अशी:-—परवां आमचे बादशहा एडवर्ड साहेब यांस जो राज्याभिषेक झाला तो त्यांस खरोखर झाला नाहीं. राजेसाहेबांची प्रकृति त्यावेळीं फारच नादुरुस्त होती व अशा स्थितींत त्यांस राज्याभिषेकाचे श्रम पडल्यास त्यांच्या प्रकृतीस धोका बसेल असें वैद्यास वाटत होतें; परंतु राजकीय कारणामुळें राज्याभिषेक तहकूब ठेवणें योग्य नव्हतें अशी पंचाईत पडली. तेव्हां सुदैवानें लंडन शहरीं राजेसाहेबांच्या हुबेहूब तोंडावळ्याचा एक भिकारी सांपडला. व त्यांस ३ हजार पौंड देऊं करून त्यांजकडून सर्व विधी करून घेण्यांत आले. हें खरें असेल तर! ........

महारोगावर औषधी— कलकत्यांतील पंडित कृपाराम यांस महारोगावरील औषध सांपडलें असून त्यांनीं बरेच रोगी बरे केले आहेत. आपल्या कौशल्याबद्दल खात्री करून देण्यासाठीं त्यांनीं तेथील बेलगाशिया हास्पटलमध्यें तेथील डाक्टरासमक्ष एका रोग्याची दोन तीन महिने सुश्रुषा व औषधपाणी करून त्यास अगदीं बरें केलें आहे. रोग्यानीं मुद्दाम अनुभव घ्यावा.

नवीन कांच— एका शास्त्रवेत्त्यानें नुकतीच एक प्रकारची कांच तयार केली आहे. ती शिशाप्रमाणें हवी तशी वांकवितां येतें, किंवा त्याने भोंकें पाडून खिळ्यानें दुसऱ्या कांचला जोडतां येतें, ह्मणजे इतर धातूप्रमाणें जवळ जवळ तिचा उपयोग होतो.

विचित्र गोष्ट —

विलायतेंतील राज्यारोहणाचे वेळीं राजेसाहेबांची स्वारी रस्त्यानें जावयाची होती त्या प्रसंगास लाखो लोक राजेसाहेबांच्या दर्शनलाभासाठीं रस्त्याच्या दुतर्फा उभे होते. त्यापैकीं कांहीं इंडियन लोकांनीं राजाची स्वारी गेली होती तेथील धुरळा मोठ्या प्रयासानें मिळवून तो थोडा थोडा आपल्या सोबत्यास मोठ्या प्रेमानें व भक्तीनें प्रसाद ह्मणून दिला. काय हा धर्मभोळेपणा!.... राजावर राजनिष्ठा दाखविणें हें निराळें आणि ज्याची गाडी जेथून धडधडत गेली तेथला धुरळा गोळा करून त्याच्या पुज्य खिशामध्यें ठेवणें हें निराळें. पहिलें नागरिकाचें लक्षण आहे. पण दुसरें गुलामगिरीचें चिन्ह होय. पहिलें स्वतंत्र मनुष्याचें कृत्य आहे. पण दुसरें केवळ जनावराना शोभणारें काम होय. मनुष्यानें राजनिष्ठ असावें, पण त्यासाठीं पशु बनूं नये!

पोटांत सर्प— युरोपमध्यें एक मनुष्य झाडाखालीं विश्रांतीसाठीं निजला असतां तो झोंपीं गेला. व अर्धा पाव तासांत तो जागा झाला व आकस्मिक त्याचें पोट मनस्वी दुखूं लागलें व तो लवकरच मेला. पुढें त्याचें पोट फाडून पाहतां एक मोठा अजगर त्याच्या पोटांतून जिवंत बाहेर पडला!

अद्भुत ताजें वर्तमान— वऱ्हाडांतील वारीचा हनुमान प्रसिद्ध आहे. तेथून एक मैलावर एकदम एकाएकी एक नवीन रस्ता उत्पन्न झाला. तो २०० हात लांब व २५ हात रुंद आहे. जवळच महादेवाची पिंडीहि निघाली आहे. तेथील नंदीचें खोदकाम तर अप्रतीम आहे. ही पिंडी फार उंच आहे व ती २०० मनुष्यांसाहि हालत नाहीं अशी एक बातमी पसरली आहे व ही ऐकून सर्वांस आश्चर्य वाटत आहे.

( पुरवणी पहा )

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

## नोटीस.

नोटीस रामचंद्र वा. परशराम भुसारी कसबे मुर्तिजापूर ता. मजकूर जिल्हा उमरावती. यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, माझा सख्खा बंधू जानबा हा मरण पावल्यास अजमासे ३ वर्षें झालीं तेव्हां पासून मजवर तगादा वगैरे केला नसून मजकडेस कर्ज आहे असेंही सांगितलें नाहीं. अलिकडेस तीन महिन्यापासून ह्मणत कीं तुझ्यावर कर्ज आहे. तर मजवर तुमचे कांहीं एक कर्ज नसून तुमचे दुकानावर मी कधींच आलों नाहीं आणि तुमचे पासून आजपावेतों एक पैसासुद्धां आणिला नाहीं. माझा बंधु जानबा यांचें तुमचे काय देणें घेणें असेल हें मजला माहिती नाहीं. अजमास तीन महिने झाले मजपासून आणि माझा बिरादर विठोबा व मी माझे वाड्यांत असामी ठेविली ती नामे चिहू धोबी असे त्रिवर्गा पासून जबरीनें भाडे चिठ्या लिहून घेतल्या, त्या कोणत्या कोणमा समजुतीनें घेतल्या याचे कारण आह्मास कांहींच समजत नाहीं. मी ज्या घरांत राहतो तें घर माझे असून, चिहू धोबी राहतो तेही घर माझे आहे. विठोबा हा माझा बिरादर असून वडिलोपार्जीत त्याचे घर आहे. सदर्हू घराबद्दल आह्मी तुह्मास कधींच खरेदीखत वगैरे करून दिले नसून वडिलोपार्जित आमची घरें आमच्याच ताब्यांत आहेत. हल्लीं भाडेचिठ्या जबरदस्तीनें घेतल्या पासून तुमचा ताबा झाला असें मी समजत नसून आह्मापासून भाड्याचिठ्या लिहून घेतल्या त्या निरर्थक असून रद्द आहेत. कदाचित माझा बंधु नामे जानबा यानें तुह्मास खरेदीखत दिले असेल ह्मणून मी रजिष्टर खात्यामध्यें अर्ज देऊन पुष्कळ रितीनें शोध केला परंतु खरेदीखत नसून फक्त एक भाडेचिठ्ठी ता. ६ माहे जून सन १८९४ इसवीची निघाली त्याची नक्कल मी घतली आहे ती भाडेचिठ्ठी माझे नांवची आहे तर ती भाडेचिठ्ठी मी तुह्मास लिहून दिली नसून नोंदणारे अम्मलदारा समक्षही गेलो नाहीं. ही भाडेचिठ्ठी खोटी बनाऊ केली आहे असे त्या भाडेचिठ्ठी वरून साफ नजरेस येतें, याजबद्दल फौजदारी कोर्टांतून जो न्याय मिळण्याचा असेल तो मिळेल. कारण जानबा हा माझा सख्खा बंधु असून वडील होता व तो आणि मी एकच ठिकाणीं राहात होतों. ही नोंदलेली भाडेचिठ्ठी खरी असती तर वडील भावाचे नांवाची असती अगर आह्मा उभयतां बंधूंच्या नांवानीं असती, तसेच माझी ३ शेतें तुह्मी निरर्थक वाहात होते, त्यापैकीं एक शेत सुलतानपूर येथील मी माझे ताब्यांत घेतल्यामुळें हें सर्व मजवर तुह्मी तुफान उभे केले आहे. हल्लींही दोन शेतें तुह्मी ९।१० वर्षां पासून वहात असून त्या शेताचे पीकाबद्दल हिशोब देत नाहीं. या हिशोबाबद्दल मी तुह्मास पुष्कळ वेळा ह्मटले परंतु तुह्मी करितो ह्मणतां परंतु करीत नाहीं. या हिशोबाकरितां कसबे अडगांव येथील संभावित पंच सखाराम मा० चिप का० वामनसा अलीमिरसाहेब आणि खंडु माळी व भोनाजी भाट व विठोबा पोवार असे पाठविले असतां तुह्मी माझे मालाचा हिशेब दाखविला नसून पंचास सांगितले कीं आमची फुरसत नाहीं. तीन महिने झाले अडगांव येथें पंच लोकांस मी नेण्या करितां आलों होतो तेव्हां पासून मी बीमार असून आज पावेतों माझी प्रकृती सुधरली नाहीं. इतके करितां नोटीस पावल्यापासून पंधरा दिवसाचे आंत माझे शेताचे मालाबद्दल हिशोब देऊन निकाल करावा असें न केल्यास न्यायाचे कोर्टांत इनसाफ होऊन नोटीशीचा खर्च आणि पंच मुर्तिजापूर येथें आले होते त्याचे खर्चासह आणि शेताचे पिकाबद्दल सर्व पैसा भरून घेतला जाईल. मी बीमार असल्यामुळें नोटीशिचा जबाब अडगांव तालुके आकोट जिल्हा आकोला येथें मिळावा. ही नोटीस लिहिली तारीख २७ माहे आक्टोबर सन १९०२ इ.

सही

किसन वल्लद बटानजी जवंजाळ
न्हाकवाडी हल्लीं अडगांव

---

## नोटीस.

बेशमी जानकाई, कडताई आणि दुलमायी मर्द भगवान मुरे राहणार निमगांव (नांदुरा) तालुके मलकापूर यांसः—

या लेखानें कळविण्यात येते कीं, आह्मी खालीं सही करणार तिघे बंधू आणि तुमचा नवरा भगवान बोवा असे चौघेजण एकत्र होतो. सर्वांत वडील बंधू सदू हे वडील जिवंत असतांनाच आपला हिस्सा घेऊन निराळे सरले होते. आज पर्यंत आह्मी चौघा बंधूनीं एकत्रपणांत स्थावर जंगम इस्टेट संपादन केली आणि त्या इस्टेटीचा उपभोगहि एकत्रपणांतच चालत आला आहे. गेल्या वर्ष सहा महिन्यांत तुह्मी तिघेजणी व आमच्या तिघांच्या बायका यांचें बनेनासें झालें, ह्मणून चुली मात्र निराळ्या केल्या. परंतु सर्व इस्टेटीची वहिवाट अविभक्तपणाचीच चालू आहे. भगवान यांस मरून सहा महिने झाले नाहींत तोंच तुह्मी फंद फितूर मांडला आहे. घरांतील देण्याघेण्यासंबंधाच्या कागदाची व कर्जरोख्याच्या पेटीची किल्ली भगवान यानें मरतेवेळींच आह्मांजवळ देऊन ठेविलेली आहे. भगवानच्या पश्चात तुह्मी अंगावरील दागदागिना विकला व गहाण ठेविला आहे असें ऐकतों. आणखीहि तुह्मी इतरांच्या फंदाला लागून दुसऱ्या इस्टेटीची नासधूप करूं बघतां आहां. या लेखानें तुह्मास कळविण्यांत येते कीं, तुह्मी तिघेजणी अन्नवस्त्राच्या मालकीण आहां. इस्टेटीवर तुमचा कोणचाहि वारसा चालणार नाहीं. इस्टेटी संबंधानें तुह्मी कोणत्याहि प्रकारची देवघेव करूं नये, अगर गहाण, किंवा विकत देऊं नये. तसेंच शेताच्या पिका संबंधानें कांहीं लुच्च्या लोकांच्या नादाला लागून दंगाधोपा वगैरे करूं नये. पेटींतील कागदपत्रांची तुह्मी अफरातफर कराल तर तुह्मी सरकारचे गुन्हेगार व्हाल. भगवानच्या नांवच्या कर्जरोख्यांचे पैसे वसूल करण्याचाहि अख्त्यार तुह्मांस नाहीं. त्याच्या संबंधानें योग्य तो बंदोबस्त आह्मी करीत आहों. तुह्मांस अन्नवस्त्र देण्यास आह्मी तयार आहों. तेव्हां तुह्मी स्वस्थपणानें रहावें, आणि असें करण्यास चुकाल तर दिवाणी फौजदारीची सर्व जबाबदारी तुह्मांवर राहील. या शिवाय घरांतील भगवानच्या खोलींत नगदी ऐवज पुरलेला आहे. त्या खोलीला कुलूप लावून तुह्मी चालत्या झाला आहां. आणि आमच्या पश्चात तुह्मी लबाड लोकांच्या मदतीनें काय कराल याचा आह्मांला भरंवसा लागत नाहीं. तर तुह्माला यापुढें त्या कोठडींत जाण्याची मनाई आहे. आणि चौकशीअंतीं त्यांतील चीजवस्तू किंवा नगदी रकम लांबविली आहे असें कळल्यास तुह्मांवर व तुमच्या साथीदारावर फौजदारी करूं. कळावें तारीख २७ माहे आक्टोबर सन १९०२ इसवी.

सह्या

मारुती वल्लद जानजी दस्तुर
खुद्द.

रामू आणि पामू वल्लद जानजी
उभयतां तर्फे मारुती वल्लद
जानजी राहणार निमगांव.

---

## जाहिरात.

सर्वत्र लोकांस या लेखानें जाहीर करण्यांत येतें कीं, जानकाई, कडताई व दुलमायी मर्द भगवान या तिघीजणी खालीं सही करणार यांच्या अविभक्त कुटुंबांतील विधवा असून त्यांची कोणत्याच स्थावर जंगम इस्टेटीवर मालकी नाहीं. जर कोणी त्यांच्याशीं व्यवहार करील आणि स्थावर जंगम इस्टेट गहाण, खरेदी अगर पट्ट्यानें घेईल तर तो व्यवहार बातल आहे आणि त्याची जबाबदारी आमच्या इस्टेटीवर येणार नाहीं. भगवान वल्लद जानजी मुरे यांच्या कर्ज रोख्याची फेड कोणी आमच्या संमती खेरीज केल्यास त्याची जबाबदारी आह्मांकडे नाहीं. आणि त्या कागदावरून घ्यावयाचें कर्ज मात्र पुन्हां वसूल करण्यांत येईल. तसेंच जर कोणी एखादी चीजवस्तु अगर नगदी रकम वरील तिघी बायां कडून घेईल तर त्याजवर चोरीचा माल घेतल्याची जोखीम येईल कोणावरहि अशी जोखीम येऊं नये व कोणी फसूं नये ह्मणून मुद्दाम ही जाहीर नोटीस दिली आहे. कळावें, तारीख २७।१०।०२ इसवी.

सह्या.

मारुती वल्लद जानजी दस्तुर
खुद्द.

रामु आणि पामु वल्लद जानजी
उभयतां तर्फे मारुती वल्लद
जानजी राहणार निमगांव

---

### ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय— मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शेंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अभ्रो सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टीमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टीफिकीटं मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ८० ८६ आणे पडेल. अनुपान वगैरे सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १०रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षें आंग्रलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्यावरच मागवावीं.

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

*K. N. ESMAYAL & Co.*

यांची अनेक रोगांवरील जगत् प्रसिद्ध २७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डीत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल
आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.

विक्रीस तयार.
सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्यांची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड- ( सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा अक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें ) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट ( सन १८८२ चा १० वा ) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८४.

दिवाणी आक्टसंग्रह- ( यांत दिवाणी कामास लागणारे सर्व अक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटि.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें व तत्वेवाईक विषयांसह येत्या माघांत निघेल.


नावें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १॥.

पत्ता- के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.

## खरेदी करा !
## रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस
## नकली मालास भुलून पैसे खर्चु नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचें बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्यास आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉन्ट्राक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकांस हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीती तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करीत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यांत येतें, व या बद्दलची जोखीमदारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

**रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें**

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ „ हंटिंग........................५०

**गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.**

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ........१५०
१९ „ हंटिंग, नकशीचे ............२५०

**मेटलचें तीन वर्षें ग्यारंटीचें.**

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ „ सेंकंद कांट्यासह............२०
१९ „ मध्यभागी सेकंद काटा असलेलें ................२२
१९ „ हाफ्‌हंटिंगचें................२०
१९ „ हंटिंगच ....................२०
१४ „ रिस्ट वॉच ....................१०

**इनगन्‌मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१९ लाईन ओपन फेस............५०
१९ „ हंटिंग........................१०
१४ „ रिस्टवॉच........................१०

**सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे**

१४ लाईन रिस्ट वॉच ............३०
१४ „ हंटिंग........................३५
१८ व १९ „ ओपनफेस ............३०
१९ „ सेंकंद कांट्यासह ............३२
१९ „ मध्यभागीं सेंकंद कांटा असलेलें ..................३५
१९ „ ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ „ हंटिंग ...................... ४९

लेडीज वॉचीस १४, १८, क्यारेट गोल्ड रुपये ६५-२०० पर्यंत.

सी. व्हिनीगर आणि कंपनी,
ओरिजिनल जिनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे
सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.

Kadi हें काय आहे ?

दाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, सतनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठवण्याचा बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईलः—

कोणत्याही एका वर्षांत ह्मणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... ।॥-




दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, मेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हे।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

पत्ता—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी मथुरा.

NOTICE

Applications are hereby invited for the post of an Overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 17—10—02 } V. M. Mahajani, Vice-Chairman M. Committee Akola.

सापकरांची
भरपूर माहितीची
## पॉकेट रोजनिशी.
सन १९०३ सालाकरितां

प्रत्येक पानावर श्रीमत् भगवद्गीतेंतील एक प्रकृत श्लोक याप्रमाणें अठरा अध्याय प्रकृत गीता डायरीमध्यें दिली जाईल.

किं ०४ आणे ट० ख० १॥ आणा.

वामन गोविंद सापकर.
पुणे. ज्ञानचक्षूचे मालक.

सहामाही „ ३ „ ८८
साल अखेर „ ७ „ १
किरकोळ अंकास........................ ०४

नोटिशी बद्दल
१० ओळीचे आंत रु० २
दर ओळीस........ ०१ ०६
दुसरे खेपेस .... ....... ०१

Six monthly .........3 ................ 8 as
Single copy ........................ 4 as

Advertisement
below 10 lines ...... 2 Rs
Per line over 10 ......4 as
Repetition Per line ...3 as

REGISTERED No. 4

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXXVI AKOLA MONDAY 17 NOVEMBER 1902 NO 44

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख १७ माहे नोव्हेंबर सन १९०२ इ० अंक ४४

विक्रीस तयार.
सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्यांची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड- (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकांची किंमत टपाल खर्चासुद्धां ८०४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें अदमासें ५०० ) किंमत टपाल खर्चा सुद्धां २०८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.
नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

---

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवैद्यौषधालय – मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्याचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

### मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिबुद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

## गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

याच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधीं मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलांची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयींनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातु व रक्त यांची वृद्धि, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जठराग्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयांचे आंत ट० ०६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखानें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

३१ गो० १ रु०; ७५ गो० २ रु० ११५ गो० ३ रु० १६५ गो० ४ रु०; २७५ गो० ६ रु०; ५५० गो० १० रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें धातूंचीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा कयाटलाग मागवावा, फुकट देऊं. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे शा३ा वर्षें आंगारलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यांस खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य.
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.

---

## वऱ्हाड शिक्षक समाज.

### सन १९०२ इसवी
कार्यक्रम पत्रक.

**सोमवार ता. २४ नोवेंबर १९०२**
सकाळीं ११ ते दुपारी १ पर्यंत.

( १ ) मे० डायरेक्टर साहेब बहादूर यांजकडून समाजाचे कामाची सुरुवात.

( २ ) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी यांनीं तयार केलेला मागील सालचा रिपोर्ट वाचून तो समाजाचे पसंतीसाठीं ठेवणें.

( ३ ) रा० शामराव जानजी हे. मा. म. शा. सुनगांव हे तिसऱ्या ईयत्तेतील मुलांस "व्याकरण" शिकवून दाखवितील.

( ४ ) प्रांतांतील शाळांतून आलेल्या पहिल्या व सहाव्या ईयत्तेंतील विद्यार्थ्यांच्या मोडी व उर्दू पुस्त्या पाहून त्यांतून उत्तम पुस्त्यांची निवड करण्यासाठीं दोन सबकमेट्या नेमणें.

( ५ ) इन्स्पेक्टर मंडळापैकीं एक इन्स्पेक्टर एखादा वर्ग शिकवून दाखवितील.

दुपारीं २ तें ४ वाजे पर्यंत.

( १ ) पोटशिक्षक समाजाकडून आलेल्या सूचना समाजापुढें वाचणें, त्यावर वादविवाद करणें व त्या मराठी शाळा, ॲंग्लो-व्हर्न्याक्युलर स्कूल, ट्रेनिंग स्कूल. मुलींच्या शाळा व हायस्कूल यांतील शिक्षकांच्या सब कमिट्यांकडे पाठविणें.

( २ ) रा० एच्० डब्ल्यु० परचुरे बी. ए. फ. अ. ॲ. व्ह. स्कूल यवतमाळ हे "संस्कृत कवि कालिदास" ह्या विषयावर निबंध वाचतील.

**मंगळवार ता. २५ नोवेंबर १९०२**
सकाळीं ११ ते १ पर्यंत.

( १ ) रा० डी. टी. भावे बी. ए. हे. मा. ए. व्ही. स्कूल मेहकर हे "मुलांच्या मानसिक शक्तींचा विकास" ह्या विषयावर निबंध वाचतील.

( २ ) शिक्षकांच्या सब कमिट्या निरानिराळ्या बसून त्यांजकडे पाठविलेल्या सूचनांचा व त्यांच्या शाळासंबंधी इतर गोष्टींचा विचार करतील व आपण केलेल्या कामाचें टिपण सेक्रेटरीकडे दाखल करितील.

दुपारी २ ते ४ पर्यंत.

( १ ) रा० एच. एम्. शेवडे प्रिन्सिपाल आकोला ट्रेनिंग स्कूल हे "व्याकरण" ह्या विषयावर निबंध वाचतील.

( २ ) वेगवेगळ्या शिक्षक मंडळांकडून बहुमतानें पसंत झालेल्या सूचना मुख्य समाजापुढें वाचून त्याचा विचार करणें व त्यापैकीं मुख्य समाजांत बहुमतानें पसंत होतील त्या इन्स्पेक्टर मंडळाकडे त्यांचे पसंती करितां पाठविणें.

( ३ ) रा० एस्. एन्. गुळवणी हे. मा. म. शा. मुंडगाव हे ट्रेनिंग स्कूल मधील २ ऱ्या वर्षाच्या विद्यार्थ्यांस "एखाद्या संख्येचें वर्गमूळ काढण्याची पद्धति उपपत्तीसह" शिकवून दाखवितील.

( सभेचें नित्याचें काम आटोपल्यावर रा० एम्. व्ही. गोलिवडीकर ए. अ. मा. ए. व्ही. स्कूल मलकापूर हे अष्टावधानाचे कांहीं प्रयोग करून दाखवितील. )

**बुधवार ता० २६ नोवेंबर १९०२**
सकाळीं ११ ते १ पर्यंत

( १ ) रा. एल्० जी प्रभुणे से० अ. मा. ए. व्ही. स्कूल आकोला हे "शाळेंतील अंतर्व्यवस्था" ह्या विषयावर व्याख्यान देतील.

( २ ) इन्स्पेक्टर मंडळापैकीं एक इन्स्पेक्टर एखादा वर्ग शिकवून दाखवितील.

( ३ ) मोडी व उर्दू पुस्त्यांच्या बक्षिसांचा निकाल सांगणें.

( ४ ) मि. फकरुद्दिन हे. मा. उ. स्कूल वाशिम हे "धंदे शिक्षणाची आवश्यकता" ह्या विषयावर निबंध वाचतील.

( ५ ) मि. सूर्यभान जानजी हे. मा. मास्तर मराठी शा० केळीवेळी हे "खेड्यांतील शाळा सुधारण्याचा उत्तम उपाय" ह्या विषयावर निबंध वाचतील.

दुपारी २ ते ४ पर्यंत

( १ ) रा. जी. जी. धारप से. अ. ए. व्ही. स्कूल उमरावती हे "आपला खरा गुरु" ह्या विषयावर व्याख्यान देतील.

( २ ) रा. एन् आर. पाथोरकर फ. अ. म. शा. बडनेरा हे मराठी तिसऱ्या ईयत्तेतील मुलांस तिसऱ्या पुस्तकांतील "खरा सरदार" हा धडा शिकवून दाखवितील.

( ३ ) राहिलेल्या सूचनांचा विचार.

( ४ ) रा. रा. स. लेले बी. ए. हेड क्लार्क डा. ऑ. प. इ. आफिस हे "कविता" ह्या विषयावर निबंध वाचतील.

**गुरुवार ता. २७ नोवेंबर १९०२**
सकाळीं ७ ते ९ पर्यंत

(१) रा० ह० अं० मराठे हे० मा० म० शा० सिरसगांवबंड हे "अईबापांचीं मुलांविषयीं कर्तव्यें" ह्या विषयावर निबंध वाचतील.

(२) चालू सालच्या जमाखर्चाचें पत्रक व १९०३ सालचें अंदाज पत्रक पसंती करितां ठेवणें.

( ३ ) पुढील सालासाठीं अध्यक्ष व चिटणीस यांची निवडणूक.

( ४ ) समाजाचे अध्यक्षाकडून समाजाचें विसर्जन.

दुपारी २ ते ५

( १ ) रा. जी. डी. खंडकर जी. बी. व्ही. सी. इन्स्पेक्टर व्हेटरीनरी डिपार्टमेंट वऱ्हाड हे "बकऱ्याचें हृदय" ह्या विषयावर सप्रयोग व्याख्यान देतील.

( २ ) शिक्षक समाजाचे सेक्रेटरी व इन्स्पेक्टर सभेचे सेक्रेटरी हे आपआपल्या समाजांत झालेल्या कामाचा रिपोर्ट वाचतील.

( ३ ) मे. डायरेक्टर साहेब ह्यांचें भाषण व समाजाचें विसर्जन.

आकोला ता. १ नोवेंबर १९०२ } S. N. Dange
R. V. Dharmadhikari
सेक्रेटरी
वऱ्हाड शिक्षक समाज

वऱ्हाडसमाचार

मिती कार्तिक वद्य २ शके १८२४

## इंग्रज लोक स्वतः सिद्ध वेदान्ती.

इंग्रज लोकांच्या आचाराविचारां विषयीं ज्यानें सूक्ष्मपणें विचार केला असेल, त्याच्या लक्षांत आलें असेल कीं, या लोकांचें एकंदर वर्तन वेदान्त्याच्या वर्तना सारखें आहे. वेदान्तज्ञानी मनुष्य जग मिथ्या समजतो. पुढें होणाऱ्या गोष्टींबद्दलच्या सुखदुःखाचा फारसा विचार करीत नाहीं, वर्तमान काळीं जें कांहीं प्राप्त होईल, तितक्यांत संतोष मानून असतो; कोणाबद्दल त्यास ममता वाटत नाहीं, यामुळें तो कोणाबद्दलही काळजी करीत नाहीं; मृत्यू विषयीं त्याच्या मनांत भीति नसते. वेदान्ती मनुष्याच्या अशा कित्येक बाह्य गोष्टी इंग्रजांस फार लागूं पडतात. वेदान्ती मनुष्याचें ज्ञान मात्र यांच्या ठिकाणीं बिलकूल वास करीत नाहीं. वेदान्ती मनुष्य जसा उदासीन ह्मणजे बेपर्वा असतो, तसे इंग्रज लोक एकंदरीनें बेपर्वा असतात. वेदान्ती मनुष्याचें वर्तन जें कांहीं असतें तें त्याच्या पारमार्थिक ज्ञानाच्या कारणानें असतें. इंग्रज लोकांच्या वर्तनालाही त्यांचें ज्ञानच कारण आहे, परंतु प्रत्येक व्यक्तीनें आपल्या स्वतःच्या वर्तनासाठीं संपादन केलेलें असें तें ज्ञान नव्हे. एकंदर राष्ट्राला जें कांहीं वळण लागलेलें आहे, तेंच वळण प्रत्येक व्यक्तीच्या वर्तनाला कारण होय. तें वळण राष्ट्रास कोणत्या कारणांनीं लागलें, त्या कारणांचा विचार फार महत्वाचा आहे. परंतु या कारणांत शिरणें ह्मणजे तो एक मोठा स्वतंत्र विषयच होणार आहे. थोडक्यात तीं कारणें अशीं— इंग्रजांचा देश मूळचा अगदीं भिकार असल्यामुळें आणि तेथील हवाही जीवरक्षणास फार थंड अशी असल्यामुळें त्यांना अत्यंत उद्योगी होणें आवश्यक झालें ही एक गोष्ट. बेटांत राहणारे असल्यामुळे त्यांना दर्यावर्दी आणि साहसी व्हावें लागलें ही दुसरी गोष्ट. जे कित्येक अत्यंत जुलमी राजे झाले, त्यांपासून राजकारणांत आणि धर्माच्या बाबतींत जो जुलूम झाला, व ज्याच्या योगानें हजारो लोक आपलीं शिरें हातांत घेऊन राजांशीं लढले, ती तिसरी गोष्ट. या व यां सारख्या इतर गोष्टींच्या कारणानें वर सांगितलेलें उदासीनपणाचें वळण सर्व राष्ट्रास लागलें. आतां आह्मी काय ह्मणतों, हें चांगलें लक्षांत येण्याला त्यांच्या कित्येक गोष्टी प्रत्यक्ष सांगितल्या पाहिजेत, त्या गोष्टी या.:–

आईबापें आपल्या लहान मुलांना तीं चार पांच वर्षांच्या वयाचींच असतां त्यांच्या भावी कल्याणाकडे लक्ष देऊन त्यांस आपल्या पासून दूर ठेवितात. इतक्या लहान मुलांचा वियोग मातापितरांनीं साहजिकपणें सहन करणें ही सामान्य गोष्ट नाहीं. हिंदुस्थानच्या लोकांना ही गोष्ट कधींही करितां येणार नाहीं. पोर आहे आणि त्याचें प्रारब्ध आहे, असा उदासीनपणाचा विचार मनांत आल्या वांचून आपल्या लाडक्या मुलांबाळांचा वियोग मातापितरांच्यानें सहन करवेल काय!

हीच गोष्ट विवाहित स्त्री पुरुषांस लागूं आहे. बायकोची प्रकृती बरी नसली तर आपल्या प्रकृतीच्या फायद्यासाठीं नवऱ्याला सोडून ती शेंकडो कोस दूर जाऊन राहाते. तीही संतोषानें मी जातें ह्मणून ह्मणते, व नवराही तिला जा ह्मणून सांगतो. अशा रीतीनें स्त्री पुरुषें महिनेच्या महिने किंवा वर्ष दोन वर्षेंही एकमेकांपासून वियुक्त राहतात, हिंदुस्तानांतील लोकांना अशी गोष्ट काळत्रयीं पतकरेल काय? नवऱ्यापासून दूर राहण्याबद्दल बायको आपण होऊन कधीं बोलणार नाहीं; व तो पाठवील तर ती संतोषानें कबूल करणार नाहीं. ती असें ह्मणेल कीं, माझें जें कांहीं होणें असेल, तें तुमच्या पायां पाशींच झालें तर मी आपणांस भाग्यवान् समजेन. पुरुष थोडें कठीण अंतःकरण करून बायकोच्या शरीर प्रकृतीच्या फायद्यासाठीं तिला दूर ठेवील, पण शें, दोनशें कोस दूर ठेवणार नाहीं.

घरांतल्या घरांत देखील इंग्रज लोकांत स्त्री पुरुषें परस्परांशीं बरींच बेपर्वाईनें वागतात, तो प्रकार वर्णन करण्यापेक्षां कल्पना करून जाणतां येईल. आजाराच्या वगैरे प्रसंगीं इंग्रज स्त्री पुरुषांचें वर्तन फारच उदासीनपणाचें असतें. काळच्या सारखा विकार झाला असता, विकृत पुरुषास किंवा स्त्रीस एकीकडे टाकून देऊन रोग्याजवळ कोणी न फिरकणें वगैरे जे प्रकार आपण पाहातों, व ऐकतों त्यावरून कुटुंबांतील माणसांबद्दल जो उदासीनपणा इंग्रजांत आहे, तो महशूरच आहे. जो तो आपल्या जीवाची काळजी करितो. दुसऱ्याचा संभाळ करावाचा तो आपणांस संभाळून करायाचा. हिंदुस्तानांत कुटुंबांतील माणसांत जें प्रेम दिसतें तें याहून वेगळ्या प्रकारचें आहे. इंग्रजी विचारप्रिय आमचे कित्येक लोक असें ह्मणतील कीं, इंग्रजांची वहिवाटच बरोबर आहे. आमच्या लोकांचें प्रेम वेडेपणाचें आहे. यावर इतकेंच उत्तर कीं, प्रेमांत नेहमीं वेडेपणा असतो, व अशा प्रकारचें प्रेम इंग्रजी कुटुंबांत नाहीं, हेंच सांगायाचें आहे.

तिसरी गोष्ट आईबाप आणि मुलें यांचा विभक्तपणा. मुलें विवाहित झालीं ह्मणजे तीं आईबापांपासून विभक्त राहतात. ही गोष्ट देखील इंग्रजांचा उदासीनपणा व्यक्त करते. चौथी गोष्ट इंग्रजांचा हिशेबीपणा होय. बायकोचें आपलें पटत नाहीं, किंवा तिच्या हातून व्यभिचार घडला ह्मणजे लागलीच तिजवर फिर्याद करून तिच्या जारापासून द्रव्य खर्च मरून घेऊन तिला सोडचिठ्ठी देण्याची वहिवाट आहे. जें मन अशा रीतीनें बायकोला सोडचिठ्ठी देऊन संतोष पावतें, तें किती प्रेमळ असेल हें सहज जाणतां येईल. वेडें असण्यापेक्षां तें हिशेबी आणि उदासीनच असलें पाहिजे. घोड्याला विशेष दुखापत झाली असतां पिस्तुलानें त्यास तत्काळ ठार करण्याला मोठी उदासीनता पाहिजे. लाडकें कुत्रें पिसाळलें, तर पिस्तुलानें तत्काळ त्यास ठार करण्याला प्रेमळ मनुष्याची हिंमत होणार नाहीं; पण इंग्रज लोकांत या गोष्टी अगदीं नित्याच्या. हिंदुस्तानचा मनुष्य जखमी झालेल्या आपल्या लाडक्या घोड्यास किंवा पिसाळलेल्या प्रीतीतल्या कुत्र्यास ठार करणार नाहीं. त्यांना तो औषधोपचार करील, आणि स्वाभाविक रीतीनें आपल्या तबेल्यांत किंवा घरांत मरूं देईल. या ठिकाणीं इंग्रजींचे भक्त आमचे कित्येक लोक असें ह्मणतील कीं, त्या घोड्याला किंवा कुत्र्याला सडत ठेवण्या पेक्षां एकदम मारून टाकणें हें त्याजवर उपकार करणें आहे. व यांतच खरें प्रेम आहे. यावर त्याला इतका प्रश्न आहे कीं, आपला बाप, बायको किंवा मुलगा यांना जर एखादा असाध्य रोग झाला, तर वर्ष सहा महिने बिछान्यांत लोळूं देण्यां पेक्षां पिस्तुलाचा प्रयोग करून एकदम यमसदनास कां पाठवूं नये?

इंग्रज लोक हिशेबी असल्या मुळें त्यांच्यांत साहजिकपणें जीं भाषणें चालतात, तीं हिंदुस्तानच्या लोकांस चमत्कारिक वाटतात. एखाद्या गृहस्थाची बायको आपल्या शेजारणी पाशीं, किंवा आणखी कोणापाशीं साहाजकपणें असें बोलते कीं, माझा नवरा मेला तर मला कांहीं काळजी करायाला नको. त्याचे बँकेंत अमूक पैसे आहेत. किंवा माझा बाप, भावशी, बहीण किंवा आणखी कोणी मेलें ह्मणजे त्याच्या इस्टेटीस मीच वारस आहे वगैरे. हा एक ऐथे नमुना दाखविला, मरण्या संबंधानें इंग्रज स्त्री पुरुषांची बोलणीं अशा रीतीनें साहजिकपणें चाललेलीं असतात. जशीं इतर गोष्टीं विषयीं बोलणीं तशींच मरणा विषयीं बोलणीं. हिंदुस्तानातील स्त्री नवऱ्याच्या मरणाला उद्देशून काळत्रयीं चकार शद्ब काढील काय? बरें, त्या गोष्टीला अनुलक्षून दुसरा कोणी कांहीं बोलेल तर तिला अत्यंत दुःख होऊन गंगा यमुना वाहूं लागतील. ह्मातारीं स्त्रीपुरुषें मात्र आडून कचित् प्रसंगीं अशीं बोलणीं बोलतात. इंग्रजी स्त्रीपुरुषांनीं किंवा मुलांनीं आपल्या प्रियआप्तांच्या मरणाला उद्देशून बोलणें हें केवळ्या उदासीनपणाचें काम आहे?

इंग्रज लोकांत पुष्कळ पुरुष व स्त्रिया अविवाहित राहातात. अनेक प्रकारचे उद्योग करून, पुष्कळ द्रव्य संपादन करितात. नेहमीं खाऊन पिऊन चैनींत राहतात. "शाल्यन्नं सघृतम्" इत्यादि भाग परिपूर्ण असल्या मुळें इंद्रियनिग्रहा विषयीं त्यांचें सामर्थ्य काय असेल तें कल्पना करूनच जाणलें पाहिजे; ह्मणजे या विचाराच्या पोटामध्यें केवढें औदासीन्य आहे, तें सहज लक्ष्यांत यईल. पशुवत् क्षणभर प्रेम करणारीं मनें कशीं असतील, हें बरोबर जाणता येणार नाहीं. अशा मनुष्याचें जगतातील इतर माणसांवर प्रेम काय असणार आहे! एकंदर मनाची वृत्ति अत्यंत उदासीन असल्या वांचून यावज्जन्म असें राहाता येणार नाहीं. अशीं अविवाहित स्त्रीपुरुषें सहजच पुढील विचार फारसा करीत नाहींत. मिळवावें, खावें, प्यावें व चैन करावी. आपण इंग्रज लोकांत जी चैनी स्त्रीपुरुषें पाहातों तीं अशा प्रकारचीं असतात. हिंदुस्थानातील मोठमोठे श्रीमंत लोक इंग्रजांसारखी चैन करीत नाहींत. याचें वर्म हेंच इंग्रज लोक पुढच्याबद्दल उदासीन असतात, व आमचे लोक मागचा पुढचा, आप्तस्वकीयांचा वगैरे विचार करीत असतात.

इंग्लंडांत लोकवस्ती दाट झाल्यामुळें तद्देशीय लोकांस स्वतःचा देश सोडून द्वीपांतरीं जाऊन राहाण्याला जागा व पोटाचा अन्न मिळविण्याचा उद्योग करणें भाग पडलें. याही गोष्टीमुळें इंग्रज लोक उदासीन झाले आहेत. देश सोडल्यावर प्रथम महासागराचा प्रवास. समुद्रपर्यटण करणारे लोक उदासीन झालेच पाहिजेत मग ते इंग्रज असोत, वा कोणी असोत. हिंदुस्थानचे लोक जर जलपर्यटण करणारे असते, तर तेही असेच झाले असते. जलपर्यटणानें धाडसही मनुष्याच्या अंगीं येतें. पुढें द्वीपांतरीं गेल्यावर त्या द्वीपांतील लोकांशीं तंटा करून राहण्याला जागा मिळवायाची. शीर हातावर घेतल्या वांचून परद्वीपस्थांशीं लढणें कसें होणार? या सर्व कारणांनीं द्वीपांतरीं जाणारांना असा विचार करावा लागला कीं, जगलों तर खाऊं पिऊं, मेलों तर गेलों. हजारो लोकांची अशी स्थिति झाली. शेंकडो लोक जलपर्यटण करीत असतां समुद्रांत बुडून मेले. शेंकडों लोक परद्वीपस्थांशीं लढतां लढतां प्राणास मुकले. आणि शेंकडों लोक आज आपली शिरें हातांत घेऊन जिंकलेल्या मुलखांत चैन करीत आहेत. शिरें हातांत घेऊन असें ह्मटलें, याचें कारण असें कीं, द्वीपांतरीं तद्देशीय हजारों लोकांत राहायाचें ह्मटलें ह्मणजे केव्हां आपल्या अंगावर कोण चालून येईल, याचा नियम नाहीं असें समजून इंग्रज लोकांस नेहमीं हत्यारबंद राहावें लागतें. जो मनुष्य नेहमीं हत्यारबंद असतो, याचें मन स्वस्थ तें काय असणार? केव्हां काय प्रसंग येईल याची त्यास नेहमीं काळजी असते. तेव्हां अशा रीतीनें एका हातांत हत्यार घेऊन दुसऱ्या हातानें भाकर खाणारा मनुष्य ईहलोकींच्या जीविता संबंधानें किती उदासीन असला पाहिजे हें सांगायाला नको.

इंग्रजांचें रोजचें शिक्षण उदासीनपणा शिकविणारेंच आहे. रोज वर्तमानपत्रें छापून प्रसिद्ध होत असतात. त्यांत इतर मजकुरा बरोबर मरणाच्या गोष्टी असतात. अमक्यानें अमक्याचा खून केला. अमुक आगबोट बुडाली, तींत अमुक माणसें मेलीं; अमक्या ठिकाणीं आगगाडी उलथून अमुक माणसें मेलीं; विजेनें अमूक मेला, सैन्यांतील शिपायांस खून चढून त्यानें अमूक मनुष्याची कत्तल केली. या प्रमाणें एका द्वीपांतल्या, व द्वीपांतरीच्या खबरा रोज प्रसिद्ध होऊन मृत्यू ही गोष्ट रोजची आणि साहजिक अशी त्यांस वाटते, व तेणें करून त्यांची मनें नेहमीं उदासीन असतात. वर्तमानपत्रांच्या योगानें हा उदासीनपणा हल्लीं हिंदुस्थानांतील लोकांमध्येंही येत चाललेला आहे. मृत्यू विषयीं जे नेहमीं विचार करितात, त्यांच्या ठिकाणीं औदासीन्य जागृत असलें पाहिजे. मुंबईंत सोनापूर ह्मणून जी प्रसिद्ध स्मशानभूमी आहे तिच्यावर जे पोलिसचे पहारेकरी व इतर नोकर लोक आहेत व जे रोज शेंपन्नास मेतें दहन झालेलीं किंवा गाडलेलीं पाहातात, त्यांचा वेदान्त किती जाज्वल्य असेल, हें सांगायास नको. वर्तमानपत्रांच्या

संस्थेनें सर्वांच्या मनावर अशा सारखा नेहमीं परिणाम होतो.

जीवावर उदार असा एक मनुष्य व जीव ज्याला प्यारा असा दुसरा मनुष्य यांच्या सारखी स्थिती इंग्रज लोक आणि हिंदुस्थानचे लोक यांची सदोदित आहे, अशा स्थितीमध्यें हिंदुस्थानच्या लोकांस जितकें सुख मिळावें तितकें हल्लीं मिळत आहे. इंग्रजांचें सुख हेवा करण्या सारखें नाहीं, हें वरील मजकुरावरून ध्यानीं येईल. तथापि त्यांचें सुख ज्यांस पाहिजे असेल त्यांना यांच्या सारखेंच झालें पाहिजे.

## सापत्न भाव

(दक्षिण आफ्रिकेंतील इंडियनांची पायमल्ली)

इंडियन लोक व इंग्लिश लोक हे एकाच सार्वभौम बादशहाचे प्रजाजन खरे, पण त्यांना ब्रिटिश प्रजेचे सारखे हक्क व अधिकार देण्यांत येत नाहींत. इंग्लिश लोक समजतात कीं आह्मी राज्यकर्ते आहों आणि इंडियन लोक पराजित व पादाक्रांत आहेत. कोठेंही इंग्लिशमन जावो, तो इंडियनाला तुच्छ मानतो, पाया खालीं तुडवावयाच्या पदार्था प्रमाणें त्याला समजतो, आणि आपला बादशाहीपणा फारच जोरानें चालवूं इच्छितो. इंडिया देश ह्मणजे ब्रिटिश राज्याचें खरें वैभव आहे पण इंडियांतच येथील लोकांशीं कशा तऱ्हेनें इंग्रज लोक वागतात याचीं उदाहरणें देण्याची गरज कोणाला वाटणार नाहीं. हा छळाचा प्रकार इंग्रजीं कॉलनींत तर फार विलक्षण रीतीनें दृष्टीस पडतो. नेटल, ट्रान्सव्हाल व ऑरेंज येथील कालनींत इंडियन माणूस बिलकूल खपत नाहीं. इंडियनाला शहरांत वस्ती करण्याला परवानगी पाहिजे, त्याला व्यापार करण्याची मनाई आहे, गाड्या घोडे वगैरे वाहनांचा उपयोग त्यानें करूं नये, हे व अशाच तऱ्हेचे प्रतिबंध इंडियनास लागू केले आहेत. इंडियन माणसानें खरोखर वरील वसाहतीस मोठीच मदत केली आहे. काबाडकष्ट करण्यासाठीं प्रथम इंडियन लोक नेमण्यांत आले. त्यांनीं सुंदर सुंदर वसाहती बसवून दिल्या आणि गेल्या ट्रान्सव्हालच्या लढाईंत इंडियनांनीं हजारो प्रकारें हीन सेवाही केली, परंतु या गोष्टींचें स्मरण राहत नाहींसें दिसतें. वसाहतींत इंडियनास सरकारी अधिकार वगैरे कालत्रयीं मिळणारच नाहींत, परंतु त्यांस साधारण राहिवाश्याचे देखील हक्क दिले जात नाहींत. हें दुष्ट वर्तन इंग्रजी कृतघ्नपणा व्यक्त करितें. त्यांच्या ह्रदयांतून हा मत्सरभाव ह्रदय फोडूनच बाहेर पडत आहे असें दिसतें. चांगुलपणाचें प्रावरण त्यांस कायम ठेवितां येत नाहीं. वसाहतींत न्यायवृत्तीला तिलांजली दिली जाते आणि आमचे सरकार ती गोष्ट तशीच चालूं ठेवितें. हें सर्व राष्ट्राला लांछनास्पद नाहीं काय ?

ब्रिटिश राष्ट्राच्या राजनीतीवरील हा डाग दूर करावा, इंडियन लोकांस ब्रिटिश प्रजेचे सामान्य तरी हक्क मिळावे आणि वसाहतवाल्या सरकारची या बाबदींत नीटपणें कानउघाडणी करण्यांत यावी या हेतूनें गेल्या महिन्याच्या २१ वे तारखेस विलायतेस एक जाहिरसभा भरली होती अध्यक्षस्थानीं मि. दादाभाई नवरोजी हे होते. पार्लमेंटाला एक अर्ज पाठवावा असें ठरविलें आणि मि० चेंबरलेन आणि लार्ड हामिल्टन यांच्या कडे मुद्दाम कांहीं गृहस्थ पाठवून त्यांच्या हातून त्या अर्जाची कार्यसिद्धी करून घ्यावी असा संकेत ठरला आहे. ट्रान्सव्हालच्या लोकांनीं इंग्लिश लोकांची थोडीशी पायमल्ली केल्याबरोबर जर एवढें रणकंदन माजलें तर वसाहतवाल्या इंग्लिश लोकांनीं इंडियन लोकांची पायमल्ली चालविली आहे त्या बद्दल मि. चेंबरलेन कांहीं शास्त्रार्थ सांगतील असा आह्मांस भरंवसा आहे. विलायतच्या पुष्कळशा मोठमोठ्या गृहस्थांनीं हा प्रश्न हातीं घेतला आहे तेव्हां कांहीं यश येण्याची आशा वाटते.

काळा व गोरा हा भेदाभेद अलिकडे फार वाढला आहे. प्रेमभाव, एकोपा, स्नेहसंबंध इत्यादि बंधनें पूर्वीं जितकीं जबरदस्त होतीं तितकीं आतां नाहींत. अलिकडे स्वार्थ फार माजला आहे आणि इंग्रज लोक आपल्या सत्तेच्या जोरावर इंडियनांची पायमल्ली विशेष करूं लागले आहेत. पाश्चात्य सुधारणा इंडियांत आली पण त्या बरोबर पाश्चात्य लोकांच्या ह्रदयांतील स्नेहभाव नष्ट होत चालला आहे असें पदोपदीं अनुभवाला येतें.

---

# The Berar Samachar

MONDAY NOVEMBER 17 1902

We are glad to welcome the new certificate of our loyalty which Lord Hamilton has eloquently passed in our favour while His Lordship was making some observations on the annual discussion of the India Budget in the parliament. We hope that our loyalty is thus beynd doubt and no righteous English Statesman will hesitate to remove the Indian disabilities under the Arms Act or such similar Acts and to lift up an Indian subject to the full measure of rights and privileges of a British subject. India is proverbially loyal to the core and the more will she ever remain so as her greatest interests and the future hopes of prosperity are at stake, which would be realized under the British rule alone. India had never enjoyed a more benign government and so she rightly hopes to realize under the British rule all her aspirations of national greatness. All our hopes lie in the goodness of our rulers and to their righteousness we have resigned ourselves. We hope for the best and time alone will decide whether we have rightly placed over confidence in the British Statesmanship.

But the revival of prosperity in India which is the main song of Lord Hamilton's speech is not a fact. This fiction of prosperity is an old stroke of policy and we are sorry that the poverty of India which Lord Curzon admitted in his circular on the Education Commission, fails to attract the attention of the higher authorities and gives a stern lie to the rosy pictures drawn in the Parliament. There is also the alarming news of the probable increase in the English soldiers in India. This means a heavy cost to a poor nation for the aggrandisement of the Imperial interests all, over the extensive world. But the poor, country, must always pay and pray.

From the question of army expenditure Lord Hamilton turns to find a deep significance in the coronation and the Delhi Durbar which he upholds as the symbolical unification of India. We are however at a loss to see how a repetetion of the coronation celebrations at Delhi will do the more usefulwork of establishing the British prestige within the four corners of the Indian empire. This second demonstration though very grand in style has no novelty about it and the sacredness of the coronation loses much of its religious character when a Durbar at Delhi is to announce that event when it is too late in the day.

---

### THE ALL—PERVADING UNITY OF THE UNIVERSE

The 'Response of Matter' is the new book by Dr. Bose which makes a new revolution in the scientific world. To a Hindu mind, it is an old thing in a living form that all matter is alive. Let us give our readers in the eloquent words of the author the grand results of the new discovery:—

Every step in this vast simplification-making them all appear as various rhythms and harmonies of a single fundamental sequence—only drives the question deeper—"Who is He that sits within, stricking the molecules this way and that? Or what is He, 'Pure, Free, ever the Witness.' Who interprets the records of strain using the brain as His galvanometer, and discarding alike the laboratory and its instruments when those no longer please Him? Dr. Bose does well to end his lecture, given at the Royal Institution May 10, with the striking passage:—

It was when I came upon the mute witness or these self-made records and perceived in them one phase of a pervading unity that bears within it all things—the mote that quivers in ripples of light, the teeming life upon our earth, and the radiant suns that shine above us—it was then that I understood for the first time a little of that message proclaimed by my ancestor on the banks of the Ganges thirty centuries ago.

"They who see but one in all the changing manifoldness of this universe, unto them belongs Eternal Truth, unto none else, unto none else"

Thus we see that the so—called vital response of living matter has met with the same fate as other differentae of the organic and the inorganic—that once more there is no hard and fast line between the living which respond and the non—living which do not, but that in both alike we see the spectacle of a matter as a whole possessing irritability and pressing out of the state of responsiveness into that of irresponsiveness having its response in both alike effected by external circumstances and agencies often identical; responding in different ways in both alike, according as the stimulus is great or little, the critical degree being often the same. In metals and plants as in animal tissues, we have been shown the phenomena of weariness and depression, together with the possfbilities of recovery of exaltation, of irresponsiveness which is death.

---

## वऱ्हाड

हवामान— थंडीचे मान वाढूं लागलें आहे. प्लेगाचा रोग बुलडाणा, खामगांव, शेगांव इत्यादि गावांत फार वाढत चालला आहे. इतरत्र ताप, खोकला वगैरे आजार वाढले आहेत. सार्वजनिक आरोग्य असमाधानकारक आहे.

मे. हेअर साहेब जुडिशिअल कमिशनर यांची स्वारी वाशिम जिल्हा कोर्टाची तपासणी करण्यासाठीं या आठवड्यांत वाशिमास जात आहे.

मि. अबदुल कदूस तहशीलदार, यवतमाळ यांस उमरावतीस कारकुनीच्या जाग्यावर पाठविल्या मुळें रा. रा. उत्तमराव यशवंतराव यांनीं तहशीलदाराचा चार्ज घेतला.

---

## नोटीस.

बेशमी सोनाबाई जवजे वळवंतराव देशमुख राहणार बोरगांव मंजू हल्लीं मुक्काम रा० रा० शिवराव बापूजी देशमुख हातेकर वस्ती हातरुण तालुका बाळापूर यांस.

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुह्मी माझी वडील सवत आहां. तुह्मी वेगळे राहूं लागण्याला २।३ वर्षे झालीं. तुह्माकडे वहिवाटीला दिलेलीं दोन्ही शेतें ज्यांची खातीं तुमच्या नावानें आहेत तीं तुह्मी विकीत आहांत असें कर्णोपकर्णी कळतें. ही शेतें विकण्याचा अधिकार तुह्माला नाहीं. माझ्या संमती शिवाय तुह्मी विक्री, गहाण वगैरे व्यवहार करितां कामा नये. तुमची व माझी मालकी सारखी आहे. तुह्मी निराळी दोन शेतें घेतलीं तेव्हांच करार ठरला होता कीं, दोघींच्या संमतीशिवाय स्थावरमाल विकू नयें. आणि तसा एक मतानें तो विकण्याचा ठरेल तर जी विक्री करील तिनें प्रथम तो दुसरीस विकला पाहिजे आणि तिने नकार दिल्यास मग तिऱ्हाईतास विकावा. या करारा विरुद्ध तुह्मी वागत आहा. अन्नवस्त्रासाठीं तुह्माला चुकती रकम पाहिजे असेल तर तुह्मी शेते माझ्या हवाली करा ह्मणजे मी तुमची सर्व सोय लावून देतें. तुह्मी केलेली विक्री वगैरे कायद्यानें रद्द आहे. तो व्यवहार इस्टेटीला बांधू शकत नाहीं. जो कोणी विकत किंवा गहाण घेईल तो फसेल. या नोटिशीचा खर्च तुह्मावर पडेल कळावें. तारीख १६ नोव्हेंबर १९०२ इ.

सही,
बनाबाई जवजे वळवंतराव देशमुख राहणार बोरगांवमंजू.
निशाणी खु.

---

## जाहिरात,

राज्याभिषेक संबंधी कवितांबद्दल.
बक्षिसें.

आकोला जिल्ह्यातील राज्याभिषेकोत्सव व्यवस्थापक मंडळीच्या कार्यकारी मंडळीनें असा ठराव केला आहे कीं, मराठी व उर्दू या भाषांपैकीं प्रत्येकांतील राज्यारोहणाच्या अभिनंदनपर उत्कृष्ट कवितांबद्दल १०-१० रुपयांचें एक अशी दोन बक्षिसें दिलीं जातील. सदरहू कविता करणारा मनुष्य हल्लीं आकोला जिल्ह्यांत राहणारा असला पाहिजे व त्या कविता ता. १० डिसेंबर १९०२ रोजीं अगर त्या तारखेच्या आत खालीं सही करणाराकडे पाठविण्यांत याव्या.

K. G. Damle
Secretary.
Executive Committee.
Akola

## Kadi हें काय आहे ?

दाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेली दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घरघर अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणे, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत सारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यास एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बॅंकची ठेव ठेवण्याची बॅंक

या सेव्हिंग बॅंक मध्यें खालील अटीवर ठेव ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल,

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक
आकोला १।७।०२ } J. Kinniburgh
एजंट

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलेल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अक्सीर का दांतो मे दिखाते है हम ।
चाट ढंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




देखना चाहिये क्या मुल्क कदर करती हे ।
ढूंडते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

मोठी डबी.... १ रु.
लहान ,, .... ·॥·

दांतावर जाळें जमणें, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आंबणें, हलूं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वांकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दांतानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यातून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस् आकोला.

पत्ता—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी, मथुरा.

## NOTICE

Applications are hereby invited for the post of an Overseer in the Municipality as a temporary measure for two years on a pay of about Rs. 50 including allowances. Persons having a thorough knowledge of public works, draining, surveying, measuring and levelling &c. should apply with testimonials.

Dated Akola 17—10—02 } V. M. Mahajani
Vice-Chairman
M. Committee
Akola.

## सापकरांची

भरपूर माहितीची

## पॉकेट रोजनिशी.

सन १९०३ साला करितां

प्रत्येक पानावर श्रीमत् भगवद्गीतेंतील एक प्राकृत श्लोक या प्रमाणें अठरा अध्याय प्राकृत गीता डायरीमध्यें दिली जाईल.

किं ०४ आणे ट० ख० ०॥ आणा.

वामन गोविंद सापकर.
पुणे. ज्ञानचक्षूचे मालक.

## मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नावेल्स, सं० नाटकें व तत्वेवाईक विषयांसह येत्या मार्चात निघेल.

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता— के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.

## नोटीस.

मुलूक अमानी हैदराबाद मुलकी कायद्यांतील कलम ७८ (८) प्रमाणें जमीनदारानें कुळावर सारा वाढविणें बद्दल बजावणीचे नोटिशीचा

नमुना

नोटीस बेशमी बालगीर वल्लद पंचमगीर गोसाई राहणार मौजे तेजनी प्रगणें राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी यांस

खालीं सही करणार यांजकडून :—

मी तुम्हांस या लेखावरून नोटीस देतों कीं मौजे तेजनी प्रगणें राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी हा गांव आमचा इनारा असून येथील शेतें

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| १३ | १९-१८ | २० |
| १८ | १०-२२ | १२ |
| | | ३२ |

हीं शेतें हल्लीं तुम्हांस माझे कूळ म्हणून तुमच्या कबज्यांत आहेत त्या शेताचा सारा येत्या शतकीचें साल सुरू होण्यापासून म्हणजे तारीख १ ली एप्रील सन १९०३ पासून रुपये ३२ चे रुपये ६० प्रमाणें सालीना वाढविण्याचा माझा इरादा आहे सबब तुम्ही येत्या १ ली एप्रील सन १९०३ पासून वाढविलेला सारा देण्याचे कबूल केले पाहिजे व कबुलायत लिहून दिली पाहिजे वाढविलेला सारा ता० १ एप्रील सन १९०३ पासून तुम्हांस कबूल करण्याचे नसल्यास वर लिहिलेली जमीन ता० ३१ मार्च सन १९०३ रोजी संपणाऱ्या चालू साल अखेरीस सोडून आमचे कबज्यांत द्यावी. ता० ८ माहे ११ सन १९०२ इसवी.

सही
दवलतराव सदाशिव पाटील इनारदार
तर्फे रामकृष्ण वासुदेव.

## नोटीस

मुलूक अमानी हेदराबाद मुलकी कायद्यातील कलम ७८ (८) प्रमाणें जमीनदारानें कुळावर सारा वाढविणें बद्दल बजावणीचे नोटिशीचा

नमुना

नोटीस बेशमी विठोबा वल्लद रावजी महाजन जात कुणबी राहणार मौजे तेजनी प्र० राळेगांव ता० केळापूर जिल्हा वणी यांस :—

खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येतें कीं मौजे तेजनी प्र० राळेगांव, ता० केळापूर जिल्हे वणी हा गांव आमचा इनारा असून येथील शेतें,

| सर्वे नंबर | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| १ | १४-२३ | १३० |
| २ | २९-३६ | |
| १७ | २०-२८ | |
| १९ | २५-३० | |
| १६ | ३७-१२ | |

हीं शेतें हल्लीं तुम्हांस माझे कूळ म्हणून तुमचे कबज्यांत आहेत त्या शेताचा सारा येत्या शतकीचें साल सुरू होण्यापासून म्हणजे तारीख १ ली एप्रील सन १९०३ पासून रुपये १३० चे रुपये २२५ प्रमाणें सालीना वाढविण्याचा माझा इरादा आहे सबब तुम्ही येत्या १ ली एप्रील सन १९०३ पासून वाढविलेला सारा देण्याचे कबूल केलें पाहिजे व कबुलायत लिहून दिली पाहिजे. वाढविलेला सारा तारीख १ एप्रील सन १९०३ पासून तुम्हांस कबूल करण्याचे नसल्यास वर लिहिलेली जमीन ता० ३१ मार्च सन १९०३ रोजी संपणाऱ्या चालू साल अखेरीस सोडून आमचे कबज्यांत द्यावी. तारीख ८ माहे ११ सन १९०२ इसवी.

सही
दवलतराव सदाशिव पाटील
इनारदार तर्फे रामकृष्ण वासुदेव.

## नोटीस.

मुलूक अमानी हैद्राबाद मुलकी कायद्यांतील कलम ७८ (८) प्रमाणें जमीनदारानें कुळावर सारा वाढविण्या बद्दल बजावणीचे नोटिशीचा नमुना.

नोटीस बेशमी बाजीराव वल्लद काशीनाथ व ढिंग्रा जात कुणबी राहणार मौजे तेजनी प्रगणें राळेगांव तालुका केळापूर जिल्हे वणी यांस.:—

खालीं सही करणार यांजकडून.

मी या लेखावरून नोटीस देतों कीं मौजे तेजनी प्र० राळेगांव ता० केळापूर जिल्हे वणी हा गांव आमचा इनारा असून येथील शेतें

| सर्वे नंबर. | एकर गुंठे | आकार रुपये |
|---|---|---|
| २ | १७-८१ | ९० |
| १२ | २९-३३ | |
| ४८ | ३२-१२ | |

हीं शेतें हल्लीं तुम्हांस माझे कूळ म्हणून तुमच्या कबज्यांत आहेत त्या शेताचा सारा येत्या शतकीचें साल सुरूं होण्या पसून म्हणजे तारीख १ एप्रिल सन १९०३ पासून रुपये ९० चे रुपये १३० प्रमाणें सालीना वाढविण्याचा माझा इरादा आहे सबब तुम्ही येत्या १ ली एप्रिल सन १९०३ पासून वाढविलेला सारा कबूल केला पाहिजे व कबुलायत लिहून दिली पाहिजे. वाढविलेला सारा ता. १ ली एप्रील सन १९०३ पासून तुम्हांस कबूल करण्याचें नसल्यास वर लिहिलेली जमीन ता. ३१ मार्च सन १९०३ रोजीं संपणाऱ्या चालू साल अखेरीस सोडून आमचे कबज्यांत द्यावी. ता. ८।११।०२ इसवी.

सही.
दवलतराव सदाशिव पाटील इनारदार
तर्फे रामकृष्ण वासुदेव.

सहामाही „ ३ „ ८

साल अखेर „ ७ „ १

किरकोळ अंकास.........................८

नोटिशी बद्दल

१० ओळीचे आंत ८०

दर ओळीस.........८१ ८६

दुसरे खेपेस ..... .....८१

Annual in arrears 7 „ 1 Rs 8 as

Six monthly .........3 ............... 8 as

Single copy .......................... 4 a

Advertisement

below 10 lines ...... 2 Rs

Per line over 10 ......4 as

Repetition Per line ... 8 as


# वऱ्हाडसमाचार.

# THE BERAR SAMACHAR


VOL XXXVI AKOLA MONDAY 24 NOVEMBER 1902 NO 45

वर्ष ३६ आकोला सोमवार तारीख २४ माहे नोव्हेंबर सन १९०२ इ० अंक ४५



## Hadi हें काय आहे ?

डाक्टर डी. एम. दस्तुर यांनीं तयार केलेलीं दमा व खोकला या वरील रामबाण औषधी.

दमा आणि खालील सर्व रोगांवर तात्कालिक व गुणकारक उपाय हाच आहे. जेथें डाक्तरांचा व इतरांचा कोणाचाही उपाय चालत नाहीं तेथें हें फार उपयोगी पडतें. याच्या गुणाबद्दल हिंदुस्थान, इंग्लंड व अमेरिका येथील रोगग्रस्तांचे व डाक्तरांचे शेंकडों चांगले अभिप्राय आहेत. कितीही जुनाट दमा, फार दिवसांचा खोकला, घशांत घाघरा अवाज होणें, वारंवार सरदी व पडसें होणें, व ताप येणें, ससनी, ब्रान्कायटीस इनफ्ल्युएन्झा इत्यादि रोगांवर हें फार उपयोगी आहे. बाटलीची किंमत फारा १॥ रुपया आहे. परंतु हें रोग्यांस एक हजार रुपयांच्या किमतीचें वाटतें.

पत्ता--मेसर्स पेस्तनजी आणि सन दुकान आकोला.

## मुंबई बँकची ठेव ठवण्यांचा बँक

या सेव्हिंग बँक मध्यें खालील अटीवर ठेवी ठेविली जाईल:—

कोणत्याही एका वर्षांत म्हणजे जानेवारीच्या १ ले तारखे पासून तों दिसेंबरच्या ३१ तारखे पर्यंत फक्त एक हजारा पर्यंत रुपये ठेविले जातील.

दोन अथवा अधिक मनुष्यांच्या नांवानें देखील एक ठेव ठेवितां येईल. व त्यांच्या हयातींत, तसेंच त्यांचे मागें त्यांच्या पैकीं एकास अथवा अधिक जणांस ठेव काढतां येईल.

एका वर्षांत एक हजार रुपयापर्यंत ठेवलेल्या रकमेवर दरसाल दर शेंकडा ३ तीन रुपये व्याज दिलें जाईल. मात्र ५००० पांच हजारा वरील रकमेस व्याज नाहीं.

मुंबई ब्यांक आकोला १।७।०२ } J. Kinniburgh एजंट

## विक्रीस तयार.

सोहोनीकृत भरपूर टिपांसहित मराठी

## कायद्याचीं पुस्तकें

सिव्हिल प्रोसिजर कोड- आवृत्ति दुसरी, पानें अदमासें ९०० निवाड्याची संख्या ६००० किंमत अति स्वस्त केली आहे. व्ही. पी. सुद्धा रु. ३

क्रिमिनल प्रोसिजर कोड- (सन १८९८ चा आक्ट ५ वा, १८९९ चा आक्ट १२ वा यानें सुधारल्या प्रमाणें) किंमत ५ रुपये व टपालखर्च ०१० आणे.

क्रिमिनल प्रोसिजर कोड— जुना आक्ट (सन १८८२ चा १० वा) किंमत ५ रुपये व टपाल खर्च ०१० आणे.

जुनें व नवें क्रिमिनल प्रोसिजर कोड एकत्र बांधविलेलें घेतल्यास वरील दोन्हीं पुस्तकाची किंमत टपाल खर्चासुद्धा ८४.

दिवाणी आक्टसंग्रह- (यांत दिवाणी कामास लागणारे सर्व आक्ट आहेत, पानें सुमारें ६०० ) किंमत टपाल खर्च सुद्धां २८

म्यानेजर, डेक्कनबुक एजन्सी,
सदाशिवपेठ, पूना सिटी.

नारो अपाजी गोडबोले
बुकसेलर बुधवार पेठ.

## दन्तकुसुमाकर

खालीं लिहिलल्या दांताच्या आजारा वर आणि इतर हरएक प्रकारच्या दाताच्या बिमारीवर हें औषध एक रामबाण मात्राच आहे.

काम अकसीर का दातो मे दिखाते है हम ।
चोट डंके की हरेक मर्ज उडाते हम ॥




मोठी डबी.... १ रु.
लहान „ .... ·॥-

दांतावर जाळें जमणे, ते पिवळे होणें, हिरड्या दुखणें, दांत आवणें, हलं लागणें, कमजोर होणें, भेगा पडणें, किडे पडणें, वाकडें तिकडे होणें, नेहमीं खपल्या पडणें कठीण वस्तु दातानीं फोडतां न येणें, दांत मळकट घाणेरडे राहणें, त्यांतून रक्त वाहणें किंवा दुःख होणें इत्यादि सर्व प्रकारचीं दुखणीं नाहींशीं होतात, प्रत्येक दिवशीं याचा उपयोग केल्यानें वर लिहिलेले कोणत्याही प्रकारचे रोग या पासून राहणार नाहींत. निरंतर दांत स्वच्छ आणि चकचकीत राहतात. कोणत्याही प्रकारची बिमारी न होतां तोंड स्वादिष्ट व सुवासिक राहतें.

एजंट—कृष्णाजी गणेश पटवर्धन आफ मेसर्स भास्कर कृष्ण जनरल मर्चंटस्
आकोला.

देखना चाहिये क्या मुस्क कदर करती है ।
ढूंढते फिरते हरेक सिम्त कदरदां हैं हम ॥

ना—
नन्दलाल वर्मा
म्यानेजर फ्रेण्ड अँण्ड कम्पनी, मथुरा.

## मासिक सुबोध इंदु.

उत्कृष्ट नाव्हेल्स, सं० नाटकें व तत्वेवाईक विषयांसह येत्या माघांत निघेल.

नांवें नोंदण्यास लिहा. वि० मा० पत्र मागवा. वर्षाची वर्गणी ट० हं० सह आगाऊ १।.

पत्ता— के. डी. फोटो आर्टिस्ट
वर्धा सी. पी.


## नोटीस

नोटीस बेशमी मुलकचंद मोहनसिंग रजपूत राहणार अंदुरे तालुके बाळापूर जिल्हे आकोले. यास:-

बचुलाल काशिराम मिसर याजकडून. नोटीस देण्यात येते कीं मंगळवारा रजपुतपुरा आकोले येथील सर्व वाडा तुमचे मालकीचा तुम्ही आह्मास ८०० रुपयास खरेदी देऊन वाडा आमचे ताब्यांत दिला. त्यांतील जागा चौका समोरील जेथें आह्मी स्वयंपाक करितो ती व त्याचे पुढील धाबे व त्यावरील माडी ही आजमासे १८।२० वर्षे झाली तेव्हां पासून मालकीचे नात्यानें आमचे ताब्यांत असून त्याचा वहिवाटही आजपावेतो आमचे कडेसच आहे. शिवाय मूळ वाड्याचे बाहेरील दोन घरें तुह्मी तुमचे घराचे देखरेखीचे मेहनताना बदल तोंडी बक्षीस देऊन आमचे ताब्यांत दिली तीही आमचेच ताब्यांत आहेत. वाड्यात तमचे मालकीची सर्व जागा घरासुद्धां तुह्मी आह्मास सन १८९९ सालांत विकून सर्व वाडा आमचे स्वाधीन केला. व खरेदीचे रुपया पैकीं तुह्मी आजपर्यंत ३०० रुपये घेतले व बाकी रुपये ५०० तुह्मास देणें आहेत ते तुह्मी घेऊन जाऊन आह्मास रीती प्रमाणें खरेदीखत करून द्यावं. सदहू वाड्याच्या भिंतीवर अमरसिंग यानें आपले खपरेल घातलें आहे ते तुमचे परवानगीनें आहे असें तो ह्मणतो करितां तुह्मी येथें येऊन त्याचें खपरेल काढून आमची दिवाल मोकळी करावी व वाड्या तील रामचंद्र परशराम तुमचा माचा हा एका कवेलने घरास कुलूप लावून एक वर्ष झालें कोठें गेला आहे तर ते घर व अनाबाई ज्या घरांत राहत त्याची माडे चिठ्ठी तुह्मी आमचे [illegible] करीत नाहीं. तुमचा माचा रामचंद्र परशराम व अन्याबाई रजपुतीण हे दोघे जण ह्मणतात कीं त्यांनीं आह्मास भाड्यानें ठेविले तर मुलकचंद ह्मणतील त्यावेळेस खाली करून देऊं. तर तीं घरें तुह्मी ४ महिन्यांत येथें येऊन खाली करून घेऊन आमचे स्वाधीन करावी नाहीं तर आह्मी रिती प्रमाणें त्यास व तुह्मास प्रतिवादी करून सर्व खर्च तुमचे अनामत खरेदीचे ५०० रुपयांतून करूं. तुमचे अंगावर खर्चाचा बोजा पडूं नये ह्मणून तुह्मास मुद्दाम नोटिशीनें कळविले आहे. आह्मी तुह्मास पुष्कळ वेळां रुपये नेण्यास सांगितले तरी तुह्मी स्वस्थ आहात तर आतां वर लिहिल्याप्रमाणें दोन घरें व भिंत मोकळी करवून द्यावी व रुपये न्यावे आणि खरेदी नोंदून द्यावे नाहीं तर ५०० रुपयांतून आह्मी सर्व खर्च करूं मग बचीत राहील तीच रक्कम तुह्मास घेणें पडेल व सदहू भींत व घरें मोकळीं नसल्यामुळें आमचें पुष्कळ नुकसान झालें आहे तें व पुढें जें होईल तें सुद्धां आह्मी सदहू रुपयांतून काढून घेऊन उरल्यास तुमचे रुपये देऊं. करितां सर्व गोष्टीचा पुर्ता विचार करून नोटिसी प्रमाणें तावडतोब तजवीज करावी. नाहीं तर त्यांत तुमचें फार नुकसान आहे. तुह्मी आमचे स्नेही ह्मणून तुह्मास खाजगी रितीनें सर्व गोष्टीचा खुलासा केला आहे. कळावें तारीख १७ माहे नाव्हेंबर १९०२ इसवी.

सही

बचूलाल काशिराम मिसर जात
कनोजी ब्राह्मण राहणार
मंगळवारा रजपुतपुरा
ताजनापेठ आकोला.

वऱ्हाडसमाचार

मित्ती कार्तिक वद्य १० शके १८२४

## वऱ्हाड प्रांत

या प्रांतासंबंधानें मोठी चळवळ चालूं आहे. लोकवार्ता अशी आहे कीं या प्रांतासंबंधाचा प्रश्न निकालालाही लागला आहे. सरकारी रितीनें या प्रकरणांत कांहींच ठराव प्रसिद्ध झालेला नाहीं. इंग्रजी पत्रकारही अगदीं मौनपणा धरून आहेत. या प्रांताचा प्रश्न जुनाच आहे. तो कांहीं नवा नाहीं. थोरले सर सालरजंग विद्यमान होते तेव्हांपासून या प्रांताबद्दल वाटाघाट चालूं आहे. लष्करी खर्चाचें कर्ज निजाम सरकाराकडे होतें. तें फिटेना म्हणून हा प्रांत कर्जाच्या फेडीकडे वहिवाटीला घेण्यांत आला. कर्ज फिटलें खरें पण या प्रांता सारखा उत्कृष्ठ भाग निजाम सरकाराला परत द्यावा किंवा देऊं नये या संबंधानें तंटा पडला होता. राजकि कारणें अगम्य विचारशक्ती तेथें कुंठते. तद्वत् प्रकार या प्रांताच्या निकाला संबंधानें घडत आहे असें कळतें.

निजाम सरकार खंबीर आहेत आणि सार्वभौम ब्रिटिश सरकार अधीक खंबीर आहेत. या दोघां सिंहाच्या वादामध्यें कोणता पक्ष खरा ठरतो हें पाहण्याची संधी येत्या दिल्लीच्या दरबारांत येणार आहे असें म्हणतात. हा प्रांत पक्या इंग्रजी खालीं गेला काय किंवा निजाम सरकाराकडे गेला काय या दोन्ही गोष्टींच्या वादांत लोकांना पडण्याचें प्रयोजनच नाहीं. या प्रकरणांत लोकमताला जागाच नाहीं आहे. निमूटपणें जें जें होईल तें पाहावें हाच आमचा प्रजाधर्म आहे. तथापि सध्या जी घडामोड चालूं आहे तिचा संबंध अगदीं आम्हांशींच असल्यामुळें मनाची वृथा तळमळ चालते अशा विवंचनेंत जर कोणी कांहीं लोकवार्ता सांगितली आणि ती खरी ठरण्यासारखीच दिसली तर मनाला एका प्रकारचा निश्चितपणा वाटतो.

ब्रिटिश सरकाराबरोबर निजाम सरकाराचा नवा तह ठरला आहे. या प्रांताचा धनीपणा निजाम सरकाराकडे राहणार आहे, परंतु हा धनीपणा कांहीं वार्षिक खंडणी पलिकडे चालणार नाहीं. हा प्रांत ब्रिटिश सरकाराकडे कायमच्या कौलपट्यानें देण्यांत येत आहे. या प्रांताचा राज्यकारभार मध्यप्रांताच्या सरकाराकडे देण्याचें वाटत आहे. व हा प्रांत यापुढें मध्यप्रांता खालीं मोडला जाईल. अर्थात या संधानानें पुष्कळशा अनुषंगिक घडामोडी होतील. त्या घडामोडी काय काय होतील याचें मनोराज्य करण्यांतच सध्यां मोठी मौज आहे. कांहीं तरी नवीनपणा आपणामध्यें येणार आहे ही कल्पना देखील विचाराला पुष्कळशी स्वतंत्रता देत आहे. या मनोराज्याच्या सुखांत वाचकांस सोडून आम्ही दिल्लीदरबाराची वाट पाहत बसतों.

## अद्भुत शोध

( वस्तुमात्राची सजीवता )

या सृष्टींत वस्तुमात्राच्या दोन कोटी करितात. पहिल्या कोटींत सजीवांचा वर्ग येतो आणि दुसरी कोटी म्हणजे निर्जीव पदार्थांची होय. सजीव व निर्जीव असें वर्गीकरण शास्त्रसंमत आहे आणि प्रस्तुत काला पर्यंत या वर्गीकरणाला सर्व शास्त्रें कबूल करितात. पण हा सिद्धांत आतां खोटा ठरला आहे. डाक्टर जगदीश चंद्र बोस हे शास्त्रीय रितीनें सिद्ध करतात कीं सर्व पदार्थमात्रांमध्यें जीव आहे या जगात निर्जीव असें कांहींच नाहीं. सजीवपणाची मोठी खूण म्हटली म्हणजे एका प्रकारची विद्युत्शक्ती आहे आणि तिचें अस्तित्व प्रस्थापित करण्याचा प्रयोग वरील प्रसिद्ध प्रोफेसर साहेबानीं करून दाखविले आहेत. या शास्त्रीय शोधानें आमच्या सृष्टशास्त्रांच्या पुस्तकांतून पुष्कळच फेरफार होतील. कित्येकांचा असा अभिप्राय आहे कीं वस्तुमात्रामध्यें जीव आहे. ही कल्पना फार जुन्या हिंदुकाळा पासून चालत आलेली आहे, परंतु त्या कल्पनेला आतां शास्त्रीय स्वरूप आलें

## प्लेग

प्लेगाचा रोग संसर्गजन्य आहेच असें कांहीं अजून सिद्ध झालेलें नाहीं. तो कसा उद्भवतो याची पूर्वपीठिकाही कोणास अवगत नाहीं. प्लेगाचा रोग एकाला झाला म्हणून त्याच्या जवळच्या माणसाला होतोच असाही अनुभव नाहीं. हा रोग स्थळ विशिष्ट असतो. तेथील हवा दूषित झाली म्हणा, तेथील पाणी वाईट आहे म्हणा, किंवा तेथील भूमीचीं द्रव्यें रोगपूलक आहेत म्हणा, हा रोग जेव्हां एका स्थळीं उद्भवतो तेव्हां त्याचा पुढील प्रसार सामीप्याच्या नियमानें होत असतो. प्लेगाचा रोग विस्तवा सारखा आहे. एके ठिकाणीं विस्तव पेटला आणि तेथून तो दुसरीकडे नेला तर तेथेंही तो पेट घेईल. असाच प्रकार प्लेगाचा आहे. प्लेगाला अनुकूळ स्थळ म्हणजे ओलसर, दमट, व घाणेरडी जागा होय. तेथें त्याची वृद्धि सपाट्यानें होते. सूर्याचा प्रकाश मोकळी हवा, चांगली स्वच्छता इत्यादि गोष्टी त्याला प्रतिकूळ असतात. पण हा सर्व वेदान्त कांहीं नवा नाहीं. परंतु वरील धोरणानें वागण्याची मोठी अडचण पडते. एकदां प्लेग उद्भवला म्हणजे त्याच्या पासून दूर जाण्या इतका चांगला दुसरा उपायच नाहीं. ही गोष्ट मात्र निर्विवाद आहे खरी. स्थलान्तराचा उपाय कोणास आवडत नाहीं असें नाहीं परंतु गरिबीच्या हलाखीमुळें पुष्कळांस या उपायाचें अवलंबन करिता येत नाहीं. अशा स्थितींत सरकारी बंदोबस्ताची धामधूम करण्यापेक्षा सरकार आपल्या खर्चानें निवाऱ्याच्या जागा बांधून देईल व त्यांच्या दवापाण्याची सोय करील तर लोक अत्यंत ऋणी होतील. सरकारानें आपल्या कर्तव्याला पूर्णपणें जागलें पाहिजे, आणि ती आणिबाणीची वेळ हीच आहे.

## महमदी धर्म

( साधारण कल्पना )

वऱ्हाड प्रांतातील मुसलमानांच्या धर्मासंबंधानें साधारण कल्पना काय काय आहेत याचें विवरण गेल्या खानेसुमारीच्या रिपोर्टांत केलें आहे. या साधारण कल्पना ध्यानांत धरण्या सारख्या आहेत आणि त्या इस्लामी धर्माचें चित्र नीट रेखाटतात. इकडील मुसलमानामध्यें आणि इतर प्रांतांच्या मुसलमानांमध्यें कांहीं मोठासा फरक दिसत नाहीं. साधारण समजूत अशी आहे कीं हे लोक विद्येनें फार मागें आहेत पण या संबंधाचे प्रत्यक्ष आकडे पाहिले तर ही समजूत चुकीची आहे असें दिसेल. शिकलेला मुसलमान आणि अडाणी मुसलमान या दोहोंमध्यें धर्माच्या मता संबंधानें कांहीं भेदाभेद दिसून येत नाहीं.

मुसलमानांचा देव एक आहे आणि ते पक्के एकेश्वरवादी आहेत खरा खुदा एकच आहे आणि महमद त्याचा पैगंबर होय. पैगंबर म्हणजे खुदाचा देवदूत होय. खुदाची खबर तो दुनियेला देतो. त्यांच्या प्रार्थना आरबी भाषेत आहेत, प्रार्थनेला ते खतम असें म्हणतात. त्यांच्या धर्मशिक्षणाला प्रारंभ कुराणापासून होतो. त्यांच्या [illegible] कधींही आढळणार नाहीं. परंतु मध्यम प्रतीच्या मुसलमानांचा त्यांच्या बरोबरीच्या हिंदूबरोबर नेहमीं सहवास घडतो आणि त्या सहवासामुळें हिंदूंच्याच पुष्कळशा धर्म समजुती मुसलमानांमध्यें शिरल्या आहेत आणि दरवर्षी मोहरमाचा सण येतो तेव्हां हिंदू प्रमाणें मुसलमानही आपल्या देवाचे मळे व शारगस्त काढतात. या हिंदुमुसलमानांची ही मिळावट दुसऱ्या एका गोष्टीनें विशेष झाली आहे. या प्रांतातील पुष्कळशा मुसलमानांचे पूर्वज हिंदू होते आणि त्यांनीं इस्लामी धर्म स्वीकारला तरी त्याचे पिढीजाद चालत आलेले रितीरिवाज सर्वच सुटले नाहींत. आणि जेथें धरपकड करितां आली तेथें इस्लामी धर्मांत हिंदूच्या गोष्टी पुष्कळशा चालूं झाल्या आहेत. तो प्रकार पुष्कळशा देशमुखी व देशपांडे घराण्यांतून आपणांस आढळून येईल. धर्मांतर पावलेले हे मुसलमान सर्व लोकासमक्ष मुसलमानी धर्मच पाळतात परंतु यांच्या घरीं कुलदेवतांची पूजा करणारे ब्राह्मण अजून आढळतात. या कित्येक मुसलमानांची हिंदू आडनांवें आजपर्यंत चालत आलीं आहेत. फलज्योतिषावर मुसलमानांचा भरंवसा असतो. शादी किंवा तसाच दिलखुषीचा प्रसंग असला म्हणजे गांवच्या ग्रामजोशाला मुहूर्त काढून द्यावा लागतो. मरणानंतर दुसरा लोक आहे असें ते मानतात, परंतु त्यांचा पुनर्जन्माच्या गोष्टीवर बिलकूल विश्वास नाहीं. मुसलमानी धर्माप्रमाणें एक कियामतचा दिवस असा येणार आहे कीं त्या दिवशीं खुदा सुलू सर्व लोकांच्या बऱ्या वाईट कर्मांचा हिशोब पाहील आणि ज्याला त्याला त्याच्या नेकीबदी प्रमाणें बक्षीस किंवा सजा देईल. मुसलमानी लोक बहुधा तरीकतवाले असतात. जें नशिबात असेल तें होईल असें हें समजतात. त्यांच्या वादाचा मोठा जोर किसमतीवर फार असतो. या प्रारब्धवादापासून भयंकर चुका होण्याचा संभव असतो आणि मनुष्य प्रयत्नाला कदाचित सोडूनही देईल, परंतु या वादाचा प्रतिरोध करणारी दुसरी एक गोष्ट त्यांच्या धर्मांत आहे. ते मानतात कीं दिल साफ व पाक ठेवण्याची जबाबदारी माणसाची आहे. तखदीराच्या गोष्टी पूर्वीच मुक्रर झालेल्या असतात हे खरें तथापि दिलाची [illegible] मनुष्याच्या अखत्यारातली आहे आणि जों पर्यंत आदमी सैतानाच्या फंदाला जुमानणार नाहीं तों पर्यंत त्याला अखेरच्या हिशाबाच्या दिवसा बद्दल फिकीर बाळगण्याचें कारण नाहीं. डुकराच्या मांसाला मुसलमान कधींहि शिवणार नाहीं. मुसलमानामध्यें गोषाची चाल फार जुनी आहे आणि गोषा राखणें हें एक धर्मकृत्य समजतात. पण जे गरीब मुसलमान असतात त्यांच्या बायका निरुपायामुळें कामधंद्याला बाहेर निघतात, बाजारहाट करितात आणि हमेषाच्या उपयोगाच्या सामान्य चिजा विकण्याची दुकानदारीही करितात. मुसलमानामध्यें मद्यपान वाईट समजतात. आणि कुराणांत मद्यपानाचा मोठा गुन्हा मानलेला आहे; पण गवळी वगैरे हलक्या जातीचे मुसलमान कांहीं कांहीं विशेष प्रसंगीं दारू फार पितात.

The Berar Samachar

MONDAY NOVEM E

24 1902

With respect to plague the Government have a two—fold duty to discharge. The first duty is to prevent its spread in so far as it lies within human powers. The second is to administer to the comforts of the dying patients. The various measures against plague stand very good on paper but when we look to the practical side of the question we confess we have yet to awaken the higher authorities to lend their hearty and sympathetic support to this cause of humanity. We expect the Government to do their level best on an immergency as the presnt, when there is every danger of the spread of plague all over the provice. The Government must come to the front with large allotments for the expenditure in this connection. But we are very much afraid that there is no proper provision of funds for the stupendous work of stamping out this fell disease.

At present there is plague at Buldana, Khamgaon and Shegao and also at some places in their vicinity. Plague is very bad at these places and there it is for months together. We would like to question whether there are any plague—sheds for these poor patients and for the persons who have to attend upon them. We fear that the medical aid does not reach a large number of patients that are daily adding to the number of the victims of the epidemic. We fully know that segregation is freely advocated. We too might advice the people to go to the far eastern islands of. Sumatra and the like. But mobilation from homes is not an easy act for the poor families to

accomplish. We assure the Government that the rich & the well—to—do persons do not wait for their assistance. Life is very dear to them and they will not fail to purchase immunity from plague at any cost. But the difficulty arises when we come to deal with the large population of the poor masses. To them even the best measures of the Government are most troublesome and devilish. Just imagine the miseries of such a family. If there be a plague case all sorts of compulsion is brought on it to vacate the house and to find shelter wherever it may find. The sheds which the Government have erected for them do not afford sufficient accommodation. Besides they are such shades as are open to the blaze of the sun and to the cold winds. One can do as well without them. A family suffers the greatest hardship when it is brought to such a shed. It is these people who live from hand to mouth that require direct and gratuitious help from the Government. If the government erect poor—houses in times of famine we think it doubly necessary to lend all sorts of possible helps when there is plague amongst the ranks of the poor people. We are sorry to remark that there is hardly any medical aid that reaches the helpless victims of plague. For the present the epidemic is restricted to a few places only and if in this case we see that there is little protection extended to the poor people, we do not know what we shall have in store for us when the worst will happen.

Berar enjoyed immunity from plague for so many years but now that special privilege seems to have been withdrawn under the decree of the Providence. We think that beefore the fell disease spreads like a wild fire, the Government should make all necessary arrangements in order to enable the people to completely evacuate the affected portions. At present there is no specific cure for plague when it actually comes. But evacuation is the best preventive remedy that is known to be of the greatest efficiency. In order that people may have a free recourse to such a measure it is the first duty of the Government to supply free accommodations in the junglesandto afford them the best medical help in times of need. This they have not done as yet. We know that this is a question of money but it must be done by all means at command. We might suggest that the additional revenue realized by the new settlements should be freely utilized for the good of the people. This will be a fitting return for the higher assessments the people have been forced to pay and it is imperatively necessary that something must be done for the people in these times of plague. We hope the Government to do their best in proportion to the great need of the hour.

—:0:—

Sir H. Cotton delivered an important address in Liverpool the other day on the subject of 'India's Economic problem' He advocates that the material prosperity of India depends mainly on the restoration of her manufacturing industries. This is the key—note of his eloquent speech. He observes:—

What was more necessary was to stimulate a demand for technical education and that could only be done by the application of capital. But where was the capital to come from? India was a very poor country, where the only rich men to be found were landlords, who were constitutionally indisposed to invest their money in industrial enterprise. From every point of view we were confronted with the staggering poverty of our Indian subjects. In confirmation of this Sir Henry Cotton quoted from an authority who had been at the pains to collect statistics and who had fonnd that in the United Kingdom, with a population of 50,000,000, there were in 6,025 banking offices deposits equal to a contribution of £20 per head while in India, with a population of 300,000,000, there were only 127 banks holding deposits equal to 24d. per head of the population. For this state of things the people of India were to some extent to blame, and there was no doubt that the progress of the country was greatly hampered by the national custom of hoarding in specie instead of investing usefully, and which was greatly opposed to the best interests of the people. It was to labour—saving appliances and to the action of machinery that one must look for any considerable advance in technical skill. The standard of living was so very low that unless machinery were introduced in a somewhat wholesale fashion the very poverty of the people would militate against it. Labour was so cheap that the introduction of machinery was rendered difficult, and it would require the re—adjustment of the relations of capital and labour on a larger scale than that which accompanied the revolution inaugurated by the discoveries of Watt and Arkwright. Addressing himself to the solution of the problem, he spoke of industrial co—operation and the joining of capital by the establishment of village banks in co—operative groups but that, he feared, was a somewhat distant prospect of realisation."

## वऱ्हाड

हवामान— मध्यंतरी आभाळ येऊन पाऊस पडण्याचीं दुश्चिन्हें होत होतीं परंतु पूर्ववत् थंडी चांगली पडूं लागली आहे. कित्येक स्थळीं थोडाबहूत पाऊसही झाला. हल्लीं हवा निरोगी व आरोग्यकारक अशी होत चालली आहे.

बुलढाणा, खामगांव, शेगांवपेठ इत्यादि गांवीं प्लेगाचें पाऊल पुढेंच आहे. प्लेगानें ग्रासलेला माणूस सहसा जगत नाहीं प्लेग हा रामबाण मृत्यूच आहे. हिंवाळ्या मुळें हा रोग स्थिरावत जाऊन प्रसृत होत आहे. लोक मोठे हवालदील झाले आहेत. ईश्वरानेंच कृपा केली पाहिजे.

ऑनररी मेजर महमद अली बेग नबाब अफसर. इ. जंग अफसर उद्दवला बहादूर सी. आय. इ यांस आनररी लेफटेनंट कर्नलचा हुद्दा विलायत सरकारा कडून देण्यांत आला आहे.

वाशिम तालुक्यांतील लोणी बुजरुक व इंपूर, पुसद तालुक्यांतील धानकी जहागीर, आणि मेहकर येथील जत्रा प्लेगाच्या भितीमुळें बंद ठेवण्यांत आल्या आहेत.

मि. एस. जी. स्टीनहाफ मेडिकल आफिसर, खामगांव यांची बदली फार वर्षांनीं उमरावतीस २०० रुपये पगाराच्या बढतीवर झाली.

तसेंच येथील सिव्हील इस्पितळांतील असिस्टंट डॉक्टर रा. रा. शिवराम कृष्ण यांस इलिचपुरास बदलल्या अन्वयें ते तिकडे जाऊन दाखल झाले.

मि. महमद अजिमुद्दीन बी. ए. तहाशिलदार वर्ग २ हे निवर्तल्यामुळें तारीख ८ आक्टोंबर पासून त्यांच्या जागीं खालील प्रमाणें वर्गावर्गी करण्यांत आली:—

| | |
|---|---|
| रा० रा० | तहशिलदाराचा वर्ग. |
| वासुदेव विठ्ठल चांदेकर | २ रा. |
| सोराबजी शापूरजी | ३ रा. |
| बळवंत यादव खोलकुटे बी० ए० | ४ था. |

गेल्या सप्तेंबर महिन्यांत या प्रांतीं १६४८४ माणसें जन्मलीं व १०३०० मरण पावलीं व अखेरच्या संख्ये पैकीं प्लेगाचे मृत्यु ४९४ आहेत.

कुमार श्री हरभामजी रावजी डिपुटी कमिशनर, आकोला यांचा आजचा मुक्काम जवळगाला असून कानफरन्सच्या निमित्त ते येथें येणार आहेत.

मेजर आर. पी. कोलंब डिपुटी कमिशनर हे रजेवरून परत येऊन इलिचपुरास दाखल झाले आणि मि. सिम्पसन साहेब हे यवतमाळास डिपुटी कमिशनर झाले.

रा० रा० रामराव बापूजी पतकी आफिशिएटिंग एक्स्ट्रा असि० कमिशनर यांची बदली उमरावतीहून आकोल्यास करण्यांत आली.

खानदेशांतून ७।८ शेर अफू चोरून आणल्या बद्दल पारसाच्या मक्तेदाराच्या नोकराला व दुसऱ्या एका खानदेशी इसमाला अनुक्रमें ६ महिने व ४ महिने अशी तुरुंगाची शिक्षा काल सांगण्यांत आली.

मि. फ्रान्सिस डायरेक्टर आफ लँड रिकार्ड हे पुढील महिन्यांत रजेवरून परत आल्यानंतर मि. मार्शल हे मूळच्या एक्स्ट्रा असि. कमिशनरीवर जातील.

धुळेकर संगीत नाटक मंडळीनें परवां रात्रीं राणीसंयोगिता या नाटकाचा प्रयोग करून दाखविला. मंडळी चांगली गाणारी आहेत व प्रयोगाहे चांगला साधला. आज रोजीं भरणाऱ्या कान्फरन्सच्या निमित्तानें ही मंडळी एक चांगला खेळ मुद्दाम करणार आहेत.

यंदा शिक्षक समाज आकोल्यास भरणार असल्यामुळें हा आठवडा मोठ्या आनंदाचा व करमणुकीचा होईल. तसेंच मे. कॅन्डी साहेब यांनीं जी ॲथलेटिक असोसिएशन स्थापन केली आहे तिच्या आश्रयाखालीं येत्या शुक्रवारीं व शनवारीं विद्यार्थ्यांचे निरनिराळे खेळ व सामने होतील. शुक्रवारीं सकाळीं ७ ते ९ वाजेपर्यंत हायस्कूलच्या मैदानांत कसरतीचे खेळ होतील. आणि दोन प्रहरीं ३ ते ५॥ पर्यंत उंच उड्या, लांब उड्या, पळण्याच्या शर्यती, दोर ओढण, चेंडू फकणें इत्यादि खेळ होतील. शनवारीं १० ते ५ पर्यंत क्रिकेट खेळ चालेल आणि शवटीं ६ वाजतां बक्षिसें वाटण्यांत येतील. शारीरिक शिक्षणासंबंधानें मि. कॅन्डी साहेबांनीं मोठा पुढाकार घेतला आहे आणि त्यांच्या मन मिळाऊ स्वभावामुळें वऱ्हाडांतील पुष्कळस गृहस्थ त्यांच्या संस्थेचे आश्रयदाते व वर्गणीदार झाले आहेत ही गोष्ट फार चांगली आहे.

## आकोला बाजारभाव

| | |
|---|---|
| हुंडी दर्शनी | ९९॥= |
| सोनें | २४।= |
| चांदी | ६४ |
| जवस | १०९ |
| जवारी | ४०-४९ |
| गहू | ९०-११० |
| बाजरी | ९२॥ |
| मीठ | ३॥॥= रु. मण |
| चणे | ३-३॥- रु. मण |
| तूप | ७॥। रु. मण |
| तेल | ६। रु. मण |
| रुई | ९३ |
| सर्की सट्टा | ९॥= |
| जवारी सट्टा | ४४ |
| बोजा सट्टा | ९१ |

कि. दि. दावा नंबर ८ क्लास २१
१९०२

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्याजला कर्ज वसूल करण्या बद्दल सरटीफिकीट देण्याचा कायदा आक्ट नंबर ७ सन १८८९ यांतील कलम ७ अन्वये नोटीस.

विद्यमान विश्वनाथ नारायण दांडेकर साहेब सिव्हील जड्ज्य आकोला यांचे कोर्टांत.

अर्जदार— नारायण श्रीधर निमोणकर वस्ती आकोला.

सर्वांस या नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, वरील अर्जदार यानें मैयत श्रीधर वासुदेव निमोणकर यांच्या कलकत्ता प्रामिसरी नोटा दोन प्रत्येकी नोट रुपये ५०० प्रमाणें एकूण रुपये १००० नोट नंबर (०००८६८) (०००८६९) याचे कर्ज वसूल करण्या करितां सरटीफिकीट मिळावे म्हणून तारीख २८ माहे आक्टोबर सन १९०२ इसवी रोजीं अर्ज केला आहे. व त्या अर्जाचे चौकशीची तारीख २९ माहे नवंबर सन १९०२ इसवी रोजी मुकर केली आहे तर सदहू दिवशीं १० वाजतां तुम्ही आपले दस्ताऐवज वगैरे पुढां आमचे कोर्टांत अर्जदार याजला कां सरटीफिकीट देऊं नये याचें कारण दाखविण्या करितां हजर व्हावें. माझे सही निशीं व कोर्टाचे शिक्यानिशीं ही नोटीस देण्यांत आली आहे. आज तारीख १६।११।०२ इ०

V. N. Dandekar
सिव्हील जड्ज्य.
आकोला.

ॐनमः श्री गणेशाय.

आर्यवनौषधालय– मुर्डी ता० दापोली

आमच्या खात्रीच्या औषधाचा गुण शंभरांतून एक दोन रोग्यांस कदाचित् न आला तर पैसे परत देऊं व त्यांचे आरोग्यार्थ आणखी एखादें उत्तम औषध द्यावें लागल्यास तें फुकट देऊं.

## मदनामृतसंजीवनी

धातुवर्धक, अत्यंत कामोत्तेजक व पौष्टिक, वीर्यस्तंभक, रक्तशोधक, मनोत्साहक, कांतिवृद्धिवर्धक, अशी सुवर्णमाक्षिक, मौक्तिक, कस्तुरी व अनेक वनस्पतीमिश्र अद्भुत

# गुटिका

उपयुक्त वनस्पतींचें मिश्रण केलें असल्यामुळें यांत अपायकारक पदार्थ अगदीं नसून खालील विकारांवर त्या अत्यंत उपयोगी आहेत.

यांच्या सेवनानें नपुंसकत्व, स्वप्नजन्य व इतर धातुपात, उन्हाळे, इंद्रिय शिथिलता कडकी, गर्मीसंबंधी मुरलेले विकार, मूत्रसंकोच, धातूचा पातळपणा, स्त्रियांची धुपणी, छातींतील रोग, हातपाय, मूत्रस्थान व नेत्र यांचा दाह, क्षय, पांडुरोग, मुलाची खर, जीर्णज्वर, अग्निमांद्य, मस्तकशूळ, मूळव्याधी, वातरोग, निद्रानाश, पित्तविकार, बाळंतरोग, मुष्टिमैथुनादि घातक संवयीनें आलेली कृशता, इत्यादि अनेक विकार खात्रीनें बरे होऊन शरीर निरोगी, मजबूत व सतेज बनतें; पचन शक्ति व स्मरणशक्ति भरपूर वाढून धातू व रक्त यांची वृद्धी, वीर्यस्तंभन व भरपूर कामोद्दीपन होतें. शक्ती भरपूर वाढून मनास उत्साह येतो. दूध व जडान्न भरपूर पचूं लागतें. गुणाबद्दल असंख्य सर्टिफिकीटें मिळाल्या व नित्य मिळत आहेत. पथ्य सेवनाची गरज मुळींच नसून स्त्रिया, पुरुष, व मुलें यांस पाहिजे त्या दिवसांत घेण्यास अत्यंत उपयोगी आहेत.

गुटिका रुपयाचे आंत मिळणार नाहींत. एकदम चार रुपयांवर कितीही घेणारास टपाल खर्च माफ. चार रुपयाचे आंत ट. ८६ आणे पडेल. अनुपान खर्डा सोबत. रोखीनें किंवा व्ही. पी. नें खालील पत्त्यावर मिळतील. दरः—

३९ गो० १ रु०; ७५ गो० २ रु०
११५गो० ३ रु० १६५गो० ४ रु०;
२७५गो० ६ रु० ५५०गो० १० रुपये.

आमचेकडे या शिवाय मोठमोठे रोगांवर अनेक औषधें असून ग्रंथस्थ रसायनें व तुर्चीं भस्में, पाक गुटिका वगैरेही माफक दरानें मिळतात. विशेष गुणवर्णनाचा सर्व सामानाचा मोठा क्याटलाग मागवावा, फुकट देऊ. टपाल खर्च वेगळा पडेल. रोखीनें किंवा व्ही. पी. नें पाठवूं.

सूचना— अलीकडे २।३ वर्षे आंजरलें वगैरे ठिकाणीं केवळ आपमतलबी ढोंगी लोकांच्या जाहिरातीस ऊत आला असून त्यांनीं आमचेच जाहिरातीची हुबेहूब कापी करून ते ग्राहकांचे डोळ्यांत धूळ फेकीत आहेत. करितां आमची सकल देशबंधूस अशी सविनय प्रार्थना आहे कीं, ज्यास खरीं शास्त्रोक्त औषधें घेणें असतील त्यांनीं आमचींच औषधें खालील बिनचूक सही पत्त्यावरच मागवावीं,

पत्ता—कृष्णशास्त्री पेंडसे वैद्य
मु० मुर्डी ता. दापोली
जि० रत्नागिरी.




## खरेदी करा !

## रास्कोपची थेट व खरी पेटेंट वॉचेस नकली मालास भुलून पैसे खर्चू नका !!!

रेल्वेच्या व इतर अवजड कामास हेंच वॉच अत्यंत उपयुक्त आहे. हें वॉच पहिल्या प्रतीचे बिनचूक वेळ दाखविणारें असून इतर वॉचेस प्रमाणें यांस नेहमीं रिपेरची जरूर नसून या बद्दल विशेष काळजी व लक्ष पुरविण्याची अवश्यकता नाहीं. ह्मणून जंगलांत बाहेर फिरणारे लोकांचें तर हें सोबतीच आहे असें अनुभवास आलें आहे. याजकरितां ज्याला आपली वेळ बरोबर राखण्याची जरूरी आहे अशा लोकांस ह्मणजे इंजिनियर, कॉंट्र्याक्टर, ओव्हरसियर, फारेस्ट कान्सरव्हेटर व इतर प्रवासी लोकास हें वॉच घेणें विषयीं आह्मी खात्रीपूर्वक शिफारस करितों. आमची **रास्कोपच्या पेटंट वॉचेस** संबंधीं याहून जास्त लिहिण्याची जरूरी नाहीं कारण त्यांच्या गुणांची प्रचीति तींच आपोआप दाखवितात, इतकें लिहिलें असतां बस्स आहे. हीं घड्याळें आपली स्वतःच शिफारस आजपर्यंत करींत आलीं आहेत, करीत आहेत व पुढेंही अशीच करीत राहतील. प्रत्येक वॉच फार काळजीपूर्वक तपासून चालवून तें वेळ बरोबर दाखविते अशाबद्दल ग्यारंटी देण्यात येतें, व या बद्दलची जोखीम दारी आमचे शिरावर आहे.

सूचनाः—पुढील नमुना २१ लाईनच्या मोठ्या आकाराच्या वॉचचा आहे.



मोठे मध्यम १६ रु. १७ रु. लहान.

### रोल्ड गोल्ड ४ वर्षांच्या ग्यारंटीचें

१९ लाईन ओपनफेस........................४०
१९ ,, हंटिंग........................५०

### गोल्ड ५ वर्षांच्या ग्यारंटीचें.

१८ लाईन ओपन फेस फिरत्या झांकणाचे ..........१५०
१९ ,, हंटिंग, नकशीचे ..........२५०

### मेटलचें तीन वर्षे ग्यारंटीचें.

रास्कॉप पेटंट २१ लाईन एकस्ट्रा स्ट्रांग १८
१९ ,, सेकंद कांट्यासह..........२०
१९ ,, मध्यमागी सेकंद कांटा असलेलें ..........२२
१९ ,, हाफ् हंटिंगचें..........२०
१९ ,, हंटिंगेच ..........२०
१४ ,, रिस्ट वॉच ..........२०

### इनॅमल्मेटल ३ वर्षांच्या ग्यारंटीचे

१९ लाईन ओपन फेस..........२०
१९ ,, हंटिंग..........२०
१४ ,, रिस्टवॉच..........२०

### सिल्व्हर वाच ४ वर्षांच्या ग्यारंटीचे

१४ लाईन रिस्ट वॉच ..........३०
१४ ,, हंटिंग..........३५
१८ व १९ ,, ओपनफेस ..........३०
१९ ,, सेकंद कांट्यासह ..........३२
१९ ,, मध्यमागीं सेकंद कांटा असलेलें ..........३५
१९ ,, ओपनफेस सुंदर नकशीचें....३५
१९ ,, हंटिंग ..........४९

लेडीज वॉचीस १४. १८, क्यारेटगोल्ड रुपये ६५–२०० पर्यंत.

**सी. हिनीगर आणि कंपनी.**
ओरिजिनल निनीयन रास्कोप पेटंट वॉचेसचे सोल एजंट.
५ हार्नबी रोड, मुंबई.



*K. N. ESMAYAL & Co.*

यांची अनेक रोगांवरील नगद प्रसिद्ध ३७ प्रकारची औषधीं विक्रीस तयार आहे. कार्डांत पत्ता लिहून कळवा ह्मणजे क्याटलाग फुकट पाठवूं.

पत्ता--खोजानुरा इस्मायल आणि कंपनी.
वर्धा. सी. पी.


दि० मोकदमा नंबर $\frac{३३}{१८९९}$

रजीष्टर नंबर ११ क्लास १० पैकीं नंबर $\frac{३}{१९०२}$

द० नंबर $\frac{१९७}{१९०२}$

विद्यमान सिव्हील कोर्ट वाशीम.

देवीसिंग बाळाराम दुकान मंगरूळपीर } वादी

अनवरखा वल्लद पीरखा चौकीदार इच. } प्रतीवादी

दावा रुपये

अनवरखा पीरखा प्रतीवादी याजला अमरावतींत तुरुंगांत पकडले वरून प्रतीवादी याणी सि० प्रो० कलम ३४५ प्रमाणें नादार ठरवून सर्टिफिकिट मिळण्यास अर्ज केला आहे तो कां मंजूर करूं नये याचें कारण दाखविण्याची तारीख २०।१२।१९०२रोजीं किंवा त्यापूर्वीं आमचकडे न कळवाल पुढे तकरार ऐकली जाणार नाहीं. कळावे तारीख १९ ११।१९०२इ०

S. H. King
सिव्हिल जज्य
वाशीम.

### नोटिशीचें उत्तर.

रा० रा० पुंजाजी वल्लद अर्जुनजी कुणबी म्हाले राहणार अडगांव खुर्द जाहागीर ता. अकोट. यांसः—

मी खालीं सही करणार या लेखानें कळवितो कीं, तुह्मी तारीख ३।११।०२ इसवी रोजीं शुद्धवऱ्हाडी वर्तमान पत्रातून नोटीस दिली ती पावली. त्यास उत्तर कीं, आपण दिलेली नोटीस मोठ्या मतलबाची लबाडीची व खोटी आहे. तुह्मी गहाणखत लिहून दिलें व नोंदणी ऑफिसरापुढें पैसे मोजून घेतले त्यावेळीं त्या खतांत दरमहा दर शेकडा व्याजाचा दर २ च आहे हें आपणांस तेथें चांगलें कळलें होतें. तुह्मी ह्मणतां त्या प्रमाणें १ रु. दर मुळींच ठरला नव्हता, व तुह्मी जे २ रुपये लिहून दिले तें काम कांहीं अंधारांत चोरून झालेलें नाहीं.

दुसरी गोष्ट. गेल्या वर्षीं शेताची सर्व कष्टमशागत मी पैसे देऊन तुमच्याच करवीं करून घेतली; तुह्मी ती फुकट केली नाहीं. शिवाय हें पीक मी मुळींच नेलें नाहीं. उलटें तुह्मी माझा लागवड मसाल्याचे पैसे न देतां पीक स्वतांच खाऊन असून ही उलटो बोंब कारता.

तसेंच तुह्मी हिशोब मागण्यास व पैसे चुकते देऊन गहाण सोडवून घेण्यास कधींच आला नाहीं. आणि लबाडीनें व दुसऱ्याच्या फंदानें खोटीनाटी नोटीस मात्र दिली. असो. आतां एवढेंच कळविणें कीं ही नोटीस पोंचल्यापासून आठ दिवसाचे आंत तुह्मी आपला हिशोब पाहून घ्यावा. आमच्या हिशोबानें तुमच्याकडे अदमासे ९०० रुपये निघतात. ही रकम वरील मुदतींत आमच्या घरीं आणून न दिल्यास मजवर जबाबदारी नाहीं. मी लागलीच तुमच्यावर योग्य कोर्टांत दावा करून अखेर निकाला पर्यंतच्या सर्व खर्चासह, व या नोटिशीच्या खर्चासह सर्व रकम भरून घेईन. या मुदती नंतर तुमची गय मुळींच केली जाणार नाहीं ह्मणून हे मुद्दाम कळविलें आहे. कळावें तारीख १७ माहे नोव्हेंबर सन १९०२ इसवी.

सहीची निशाणी
रावोजी वल्लद भिवसन गोलाईत
राहणार मौजे खंडाळे ता.
आकोट पोस्ट रूपराव हिवरखेड
याचे हातची.

☞ हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.